म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. १६३१८९ नों १८।१२।८५
वि. बाल

# अजबगजब मंडळ

आशा भाजेकर

संपादक : भा. रा. भागवत

IRBK-0116179
IRBK-0116179

मॅजेस्टिक प्रकाशन

मॅजेस्टिक किशोर साहस

पाच रुपये

पहिली आवृत्ती :
फेब्रुवारी, १९७५

सर्व हक्क प्रकाशकाधीन

मुखपृष्ठ व रेखाचित्रे :
हवालदार

प्रकाशक :
अ. के. कोठावळे,
मॅजेस्टिक प्रकाशन,
३१६, प्रसाद चेम्बर्स,
मुंबई

मुद्रक
अ. के. कोठावळे,
ॐ मुद्रणालय,
२५० अ, शनिवार पेठ, पुणे ३०

आवाजाचा गजवदनला पत्ताच नव्हता. तो आपला “ घुSS रे, घुSS रे ” मस्त लयीत घोरत होता. अजयने आपला मोर्चा त्याच्याकडे वळवला.

“ अहो कुंभकर्ण ! घोराख्यान पुरे. उठा आता ” गजवदनला गदगदा हलवीत तो म्हणाला.

पण त्याचा काहीच परिणाम झाला नाही. गजाने फक्त कूस बदलून एक लाथ झाडली. तीच तंगडी पकडून तळपायाला गुदगुल्या करीत अखेर अजयने त्याला जागे केलेच.

“ अज्या ! लेका काय मस्त स्वप्न पडत होतं ” जाग येताच गज्या म्हणाला, “ मी कुठे होतो. माहीत आहे ? ”

“ आहे ना ! ”

“ कुठे ? ”

“ गुलमोहर बिल्डिंगच्या आठव्या मजल्यावरच्या माझ्या खोलीतल्या डनलॉपच्या गाद्यांवर —”

“ अरे छट् ! नाहीच ओळखता यायचं तुला. अरे, मला स्वप्नात शेर्पा तेनसिंग भेटला आणि त्याने मला आपल्याबरोबर एव्हरेस्टवर नेलं, आहेस कुठे ? ”

“ इथंच आहे. मीपण आणि तूसुद्धा. ” गज्याच्या हातातून, वाचता वाचता झोप लागल्यावर पलंगाखाली पडलेले ‘ शेर्पा तेनसिंग ’ हे पुस्तक उचलून त्याची दुमडलेली पाने सारखी करीत अजयनं उत्तर दिले. पण गज्याचे त्याच्याकडे लक्षच नव्हते. तो आपल्याच स्वप्नाच्या नादात पुढे सांगायला लागला,

“ अरे, काय धमाल बर्फ सगळीकडे ! तेनसिंगने एक दोर त्याच्या कमरेला नि माझ्या कमरेला बांधला, आणि मग आम्ही तो बर्फाचा उंच कडा चढू लागलो–

“ खरंच गज्या ! असं [illegible] हिजे आपल्याला.

IRBK-0116179
IRBK-0116179

काय थ्रिल असतं त्यात ! नाहीतर आपण हे बिल्डिंगचे आठ मजले-सुद्धा लिफ्टने चढणार. मी म्हणतो. खरं म्हणजे एक दोर या गॅलरीतून खाली का सोडू नये ?– त्यावरनं चढून येण्यात काय धम्माल मजा येईल नाही, अज्या ? ”

“ खरंच गज्या ! मलासुद्धा काहीतरी खूप मोठं साहस करावंसं वाटतं. पण ही– ही मोठी माणसं आहेत ना— साधं काश्मीरलासुद्धा आपल्या-बरोबर नेलं नाही. अरे, आम्ही लहान आहोत म्हणून तर सरसर डोंगर चढलो असतो. तुमच्यासारखं येवढंसं चालल्यावर ‘ फा फू ’ करीत बसलो नसतो. बर्फावरनं सुर्रकन् घसरलो असतो, घोड्यावरनं टॉकटॉक करीत हिंडलो असतो– ” कल्पनेने काश्मीरच्या डोंगरदरीचे चित्र मनासमोर आणीत अजय म्हणाला.

“ तू हट्ट धरायचास अज्या— खरं म्हणजे. अगदी सॉलिड रुसून बसायचंस. ”

“ काय उपयोग नाही रे ! आमची आई आमच्यापेक्षा सॉलिड आहे. तिचा शब्द म्हणजे– ते जाऊ दे. पण गज्या, आपल्याला इथेसुद्धा काही साहस करता येईल की– ”

“ इथे काय करणार कपाळ– ”

“ का नाही ? अरे हा मृत्युंजय डिटेक्टिव्ह काय हिमालयात गेला होता का ? या मुंबईतच त्याने किती गुन्ह्यांचे तपास लावले आहेत, किती खुनी दरोडेखोरांना आणि चोरांना पकडून दिलं आहे. तो नव-लाखाचा हार चोरणारा– खरंच, गज्या, आपल्याला असा कुणी चोर भेटला तर काय मज्जा– ”

“ ए हे रे दीड शहाण्या ! तो चोर काय आपणहून तुला सांगायला येईल की मी चोर आहे हो चोर– मला पकडा म्हणून. अजब आहेस !”

“ आपण शोधून काढूया रे त्याला. या मुंबईत इतके चोर आहेत,

सारख्या बातम्या येत असतात. आपल्याला काय एकपण नाही भेटणार ? समुद्रावर, रेल्वेच्या डब्यात, सिनेमाच्या आवारात–डिटेक्टिव्ह मृत्युंजयला तर तो भाजीबाजारात दिसला प्रथम."

"अरे, पण आपण त्याला ओळखणार कसा ? मृत्युंजयजवळ त्याचा 'फ्लेल्हर' कुत्रा आहे. आपल्याजवळ कुटे आहे कुत्रा ?" गज्याने रास्त शंका काढली.

"हो, तेही खरंच, कुत्रा हवा एक. भास्कर– हो भास्करकडे आहे कुत्रा एक– आयडिआ ! गज्या, एक मस्त कल्पना सुचली आहे बघ. आपण एक टोळी स्थापन करूया. तू, मी, भास्कर, बुलुंद– त्याला नाव देऊया 'भटकी जमात'. भूगोलाच्या पुस्तकात आहे ना तशी–"

"वा, वा, अज्या, तुला डोकं आहे खरं. उगीच नाही किरपेकर सर तुला नावाजत," गज्या आनंदाने म्हणाला. त्याला ती टोळीची कल्पना फारच आवडली.

"चल तर मग ! तू जा भास्करकडे. मी बुलुंदला बोलावतो."

"कुठे जमायचं ? इथेच ? आणि नली ?"

"खरंच की– तिला टोलीला घ्यायला हवी, नाहीतर– ठीक आहे. पण आधी काही बोलू नकोस तिला. फारच मागे लागली तर लिंबूटिंबू करून टाकू तिला. आणि घरात नकोच. आमचं खाली गॅरेज आहे ना सध्या रिकामं तिथे भास्करला घेऊन ये तू ठीक सहा वाजता."

"अज्या, काकू दूध प्यायला बोलावताहेत–" दारात येऊन नलीने पुकारा केला, तसे दोघेही उठले.

□

# २. मंडळ स्थापन झाले

ठीक सहा वाजता तळघरवजा गॅरेजमधे अजय, भास्कर, बुलंद आणि गज्या जमले. गॅरेजमधल्या सामानाच्या पेटीवर बसत अजयनं विचारले,

" आलात सगळे ? भास्कर– अरे, तुझा जिगर कुत्रा कुठाय ? त्याला का नाही आणलास ? आपल्या मंडळाचा त्यालासुद्धा सभासद करून घ्यायचाय ! "

" परवाच्या मारामारीत त्याच्या पायाला दगड लागला. अजून जखम बरी नाही झाली चांगली, म्हणून नाही आणला ! पण अज्या, कसलं मंडळ म्हणतोस ? "

" खरंच अज्या, काय म्हणत होतास मघाशी, ते मला कळलंच नाही. नीट सांग— " खिशातून भाजलेल्या शेंगदाण्यांचा पुडा काढून तो सोडीत बुलंद म्हणाला.

दाणे पाहिल्याबरोबर भास्कर, गज्या दोघांनीही भसकन कागदावर हात मारला. पण त्यांना थांबवीत अजय म्हणाला,

" हां दोस्त, थांबा. काम आधी. खाणं नंतर ! "

गज्याने नाइलाजाने हातातले दाणे टाकले. अजयनं बोलायला सुरुवात केली,

" मंडळी, आज आपण इथं का जमलो आहोत याचा गंभीरपणाने विचार करूया. आपल्या या भारत देशात आणि त्यातही मुंबईसारख्या अवाढव्य शहरात गुन्हेगारी वाढते आहे. त्याचं टक्केवारी प्रमाण तुम्ही परवाच्या रविवारच्या लोकसत्तेत वाचलं असेलच. पोलिसांना सगळ्या गुन्ह्यांचा पत्ता लागतोच असं नाही, तेव्हा जनतेनं त्यांना सहकार्य

द्यावं अशी विनंती— "

"लेका, भापण नको ठोकू! काय ते खुल्लम् खुल्ला सांगून टाक." बुलुंद म्हणाला. त्या सगळ्या मंडळीत तो बुद्धीने जरा मंद असल्याने त्याच्या डोक्यावरून ते जात होते, पण बुलुंदचे शरीर कमावलेले होते. रोज सकाळी आखाड्यात जाऊन कुस्तीचे चार हात करण्याचा, मलखांब, जोर, बैठका असल्या व्यायामाचा त्याला नाद होता. मारामारीत चार-जणांना तो भारी होत असे.

"हे बघ बल्या, मी सांगतो तुला—" गज्या म्हणाला, "या अज्याचं म्हणणं असं की सुट्टीत नुसतं बसून बसून कंटाळा येतो की नाही, तेव्हा आपण चौघांची एक टोळी स्थापन करायची— "

"ए, टोळी शब्द काहीतरीच वाटतो बुवा!"

"बरं, मंडळ म्हण— तर असं मंडळ स्थापन करायचं आणि काहीतरी काम करायचं– "

"काम म्हणजे साहस करायचं. नुसतं काम नव्हे. नाहीतर निघ-शील कुदळ घेऊन रस्ता खणायला– तर तसलं काम नव्हे. कामात काहीतरी साहस पाहिजे. सनसनाटी पाहिजे. म्हणजे कुणाची तरी मारामारी सोडवणं, कुणाला तरी वाचवणं, चोर वगैरे पकडून देणं— "

"हां हे झकास आहे गड्या काम!" बुलुंदला मारामारीची कल्पना



एकदम आवडली. शर्टाच्या दोन्ही बाह्या वर सारून तो उभा राहिला. त्याला खाली बसवीत भास्कर म्हणाला,

" अरे, आत्ताच कुठं निघालास मारामारी करायला ? बैस खाली. नीट ऐकून घे सगळं. हं, अज्या, सांग— "

अजयने सुरुवात केली.

" तेव्हा दोस्त, आपण एक मंडळ स्थापन करायचं. त्याचं नाव ठेवायचं भटकी जमात– "

" भटकी जमात ? हे कुठून काढलंस नाव ? " भास्करने विचारले.

" अरे, आपल्या भूगोलाच्या पुस्तकात नव्हती का ? "

" छे, पण हे काही चांगलं नाव नाही " बुलंद म्हणाला.

" मग सुचवा ना कुणाला आणखी काही सुचत असेल चांगलं तर–"

अजयने असे म्हटल्यावर प्रत्येकजण डोके खाजवू लागला. बुलंदच्या डोक्यात तर सहजासहजी काही शिरतच नव्हते. पण भास्करला विचार करता करता पटकन एक नाव सुचले. चुटकी वाजवून तो म्हणाला,

" आयडीआ ! मला एक छान नाव सुचलं आहे. गड्या अजय, ही अजब कल्पना तुझ्या डोक्यातून सुचली आणि ह्या गज्याने तुला साथ दिली तेव्हा मंडळाचं नाव ' अजबगजब मंडळ ' का ठेवू नये ? "

" वा, वा, भास्कर ! झकास नाव सुचवलंस ! " त्याच्या पाठीवर थाप मारून गज्या म्हणाला, " मग काय अज्या ? पसंत आहे ना ? "

" सूचना मतास टाका " अजय म्हणाला.

" ए, मतं कसली घेतोस ? "

" असं नाही, आता आपण मंडळ स्थापन केलं आहे ना ? " अजयने विचारले. त्यावर सगळ्यांनी एका सुरात उत्तर दिले, " हो ऽऽ "

" मग मंडळाच्या नियमाप्रमाणे चाललं पाहिजे. "

" ठीक आहे यार. आमचे हात वर– दोन्ही. "

" सूचना एकमताने मंजूर. मंडळाचं नाव अजबगजब मंडळ. आता मंडळाचा प्रमुख सूत्रधार कोण याची निवड करा. "

गज्या उठून उभा राहिला. " ही कल्पना मूळ अजयची असल्याने त्यानेच ह्या मंडळाचे सूत्रधार व्हावं अशी मी सूचना करतो. "

" माझे त्याला अनुमोदन आहे " भास्कर म्हणाला.

हीही सूचना एकमताने पास झाली. सगळ्यांनी जोरजोरात टाळ्या वाजवल्या.

" अज्या, आता दाणे खायचे का तुझी निवड झाल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ ? " गज्याने दाण्यांच्या पुडीकडे पाहात अधीरपणाने विचारले.

" वा रे वा ! तो निवडून आलाय तर त्याच्याकडनं पार्टी घ्या की. माझ्या दाण्यावर का भागवता ? "

" बुलुंद इज करेक्ट. "

" गड्यांनो, थांबा, " अजय म्हणाला, " अजून आपलं काम संपलेलं नाही. बल्या, घाबरू नकोस. मीटिंग संपली की मीदेखील देणार आहे काहीतरी– पण आधी काम. तेव्हा दोस्तहो, मघाशी मी म्हटल्याप्रमाणे जनतेकडून पोलिसांना जे सहकार्य हवं आहे ते आपण द्यायचं— थोडक्यात म्हणजे आपण एखादा गुन्हेगार, चोर पकडून द्यायचा अगदी मुद्देमालासकट. "

" कुठे आहे चोर ? दाखव मला, आत्ता त्याची मानगूट पकडून आणतो. या बुलुंदची ताकद माहिती नाही– "

" त्याला शोधायचा आहे अजून, बुलुंद. मग तुझी ताकद दाखव– तेव्हा उद्यापासून प्रत्येकाने नाक्यावर, रेल्वे प्लॅटफॉर्मवर, समुद्रावर जिथे जमेल तिथे जाऊन टेहेळणी करायची आणि संशयास्पद असं काही आढळलं की लागलीच मंडळाला खबर द्यायची. तातडीने सगळ्यांना

इशारे गेले की सगळ्यांनी इथेच या गॅरेजमधे जमायचं, विचार करायचा आणि पुढचे बेत आखायचे. कळलं ?"

काहीतरी साहस करायचे या कल्पनेनें सगळ्यांचेच चेहरे चमकले होते. जोरात मान हलवीत भास्कर म्हणाला,

"एकदम मान्य, अजय! पण प्रत्येकाने एकमेकाला द्यायचा इशाऱ्याचा शब्द सांग ना एखादा. सगळ्या ठिकाणी मोकळेपणाने सांगता येईलच असं नाही. आणि घरातल्या माणसांना तर मुळीच कळता कामा नये."

"करेक्ट! गज्या, तू सुचव."

"वेगळं कशाला सुचवायला हवं? आत्ता आपण मंडळाचं नाव ठेवलं आहे ना, 'अजबगजब' तोच परवलीचा शब्द करू या. आपल्याशिवाय कुणालाच माहिती नाही त्याची."

"छट्! ते नको. दुसरं सुचव. तेच तेच नाव काय—" बुलंदने खोडा घातला.

"मग चालव ना डोकं तुला असलं तर—"

"अरे यार! त्यात काय— सांगू? भिरभिरं घ्या." कोपऱ्यात एक फाटलेले जुने भिरभिरे पडले होते ते उचलून घेत बुलंद म्हणाला, "अज्या, हे कुठनं आलं रे?"

"आमच्या ड्रायव्हरच्या पोरीचं असेल. पण ते जाऊ दे. भिरभिरं हा शब्द छान आहे परवलीला. तेव्हा आता आजची मीटिंग संपली. बोला, अजबगजब मंडळ झिंदाबाद— हं, बुलंद! सोड आता तुझी पुडी." अजयने खिशातून चॉकलेटची दोन पाकिटे काढीत म्हटले.

"अजबगजब मंडळ झिंदाबाद!" सगळ्यांनी त्याच्या सुरात सूर मिळवला आणि खाण्याच्या वस्तूंवर झडप घातली.

□

# ३. लिंबूटिंबू सामील

तोच बाहेर पावलांचा आवाज आला. कुणीतरी धावत गेल्यासारखे वाटले. अजयने चटकन हातातला घास टाकून बाहेरच्या बाजूला धाव घेतली. पण जसा आत तसा बाहेरही अंधार पडला होता, त्यामुळे त्याला काहीच दिसले नाही. तो परतला.

" काय झालं रे ? उठलास का एकदम ?" बुलुंदने दाण्याचा बोकाणा दाढेखाली सारीत विचारले.

" तुम्हाला नाही आवाज ऐकू आला ? "

" कसला ? "

" कुणीतरी धावत गेल्याचा ? "

" छे ! नाही बुवा ! " भास्कर म्हणाला.

" तुला भास झाला असेल. पलीकडच्या गॅरेजमधे मोटार ठेवल्याचा आवाज आला " बुलुंद म्हणाला.

" नाही रे ! मोटारच्या आवाजात तुमचं लक्ष गेलं नाही, पण मी नक्की आवाज ऐकला. "

" मलासुद्धा आता कुणीतरी पळाल्याचा आवाज ऐकल्यासारखं वाटतंय रे अज्या "—गज्या म्हणाला.

" हुंऽऽ, नुसतं वाटतंय. अरे, डिटेक्टिव्हचं काम करायचं म्हणजे कान कसे तीक्ष्ण हवेत सगळ्यांचे. चौफेर बारीक नजर असायला हवी. नुसतं खादाडीत लक्ष ठेवून नाही चालायचं. "

" कुणीतरी चोरून ऐकत असलं पाहिजे आपलं बोलणं. का चोरच होता रे गॅरेजमधलं काही सामान चोरायला आलेला ? पकडायला हवा होता साल्याला ! " बुलुंद उठून उभा राहात म्हणाला.

“आता अवसान आणून काय उपयोग, बल्या? मूळ संशयित केव्हाच निसटला आहे?” भास्कर म्हणाला.

“खरंच, भास्कर— तुझ्या कुत्र्याला आणायला हवा होतास. त्याला मागावर सोडला असता आपण—”

“अरे, त्याचा कुत्रा काय करणार? येवढंसं पिल्लू ते. जरा मोठा आवाज झाला तरी पायात शेपटी घालून पळतं कुईं कुईं करीत.”

“मग लहानच आहे अजून. मोठा झाल्यावर बघ.”

“कोण असेल रे अजय? पाय हलके वाजले का जोरात? पायात बूट होते का वहाणा? मोठ्या माणसाचे वाटले का”—गजाने प्रश्नावली चालू केली.

“जाऊ दे रे! उगीच कीस काढताय. कुण्णीसुद्धा नसेल. म्हणजे नव्हतंच. या अज्याच्या डोक्यात तेच भिरभिरतंयना, म्हणून वाटलं त्याला. आता तुम्ही येताय का मी एकटाच संपवून टाकू हे सगळं?” बुलुंद कंटाळून म्हणाला. तशी सगळ्यांनी पुन्हा आपापला वाटा ताब्यात घेतला.

मंडळाच्या सभासदांना नाक्यावर पोचवून अजय आपल्या घराच्या लिफ्टपाशी आला. साहसाचे वारे अंगात नुसते भिरभिरत होते. दुपारी गज्या म्हणाला त्याप्रमाणे त्यालासुद्धा दोराला धरून आठ मजले चढून जावे असे वाटत होते. पण काय करणार—ह्या सगळ्या वस्तीतले लोकच मुळी आळशी, सुस्त आणि सुखवस्तू! नुसते मोटारीत बसून हिंडतात आणि बाजारात ढीगभर खरेदी करतात. त्यापेक्षा बुलुंद राहतो ती भीमसेनवाडी किती चांगली. तिथे सारखं काही ना काही धमाल घडत असतं. पाण्याच्या नळावरून भांडणं, जागेवरून मारामारी—जरा काही

झालं की लगाव ठोसा—

अजयने वर जाऊन आपल्या घराची घंटी दावली. दार नलीनेच उघडले.

" किती उशीर केलास रे ? कुठे गेला होतास ? " नलीच्या डोळ्यांत वेगळीच चमक दिसत होती.

" तुला काय करायच्यात चौकशा ? गेलो होतो कुठंतरी. " अजयला थोडासा संशय आला. त्याने विचारले, " तू कुठं गेली होतीस उनाडायला ? "

" अय्या ! उनाडायला मी काय अज्या आहे ? मी आपली भावलीला आंघोळ घातली. नवा परकर शिवून नेसवला आणि तिला घेऊन फिरायला गेले. कित्ती वेळ झाला येऊन. आम्हाला भूक लागलीय. जेवायचंय म्हणून चौकशी केली—"

" मग घ्यायचं होतंस जेवून. इथे कुणी अडवलंय ? "

" पण एकटीला जेवण जात नाही ना ! "

इतक्यात काकूंची हाक आली, " आला का ग ? चला लवकर. गरम गरम फुलक्या टाकते आहे. "

" आलोच, काकू " अजय हातपाय धुऊन पटकन् टेबलापाशी येऊन बसला.

" ए हेरे, काही देवाला नमस्कार, शुभं करोति म्हणायचं नाही वाटतं ? आईला कळलं तर "—

" गप ग तू ! उशीर झालाय, वर भूक लागली असेल. अजय, इतका वेळ घराबाहेर राहू नये बाळा. आता पटकन् देवाला नमस्कार करून ये आणि करा सुरुवात. तुला आवडतात म्हणून मेथीचे वडे केले आहेत बघ आज. " काकूंनी अजयची बाजू सावरली.

नलीला वाकुल्या दाखवून अजयने मेथीचा वडा तोंडात कोंबला.

पण अजयने चिडवले तरी नली आज चिडली नाही. उलट ओठाच्या कोपऱ्यातून हळूच हसत होती.

आवडते वडे खाण्याच्या नादात अजयच्या ते लक्षातच आले नाही.

सकाळी उठून अजय वेसिनवर तोंड धुवायला गेला. नली अजून उठलेली दिसत नव्हती. तिचीही पेस्ट ब्रशावर काढून ठेवून अजयने तोंड धुतले. डोळ्यांवर पाणी मारून ओला हात केसांवरून फिरवता फिरवता त्याने आरशात पाहिले आणि तो चमकलाच.

कारण आरशावर त्याला अक्षरे दिसली :

" अजबगजब मंडळ झिंदाबाद ! "

प्रथम त्याला वाटले—आपल्याला भासच होतोय. कालचंच डोक्यात घोळतंय. काकू म्हणतात ना—मनी वसे ते सगळीकडे दिसे ! पण त्याने डोळे चोळून पाहिले, तर खरेच आरशावर अक्षरं ! कुणीतरी कागदाच्या कपट्यावर लिहून तो कपटा आरशावर डिंकाने चिकटवला होता.

कुणाचं हे काम ? कुणाचं हे अक्षर ?

अक्षर मुद्दाम तिरके काढले होते, तरी अजयने ओळखले की हे अक्षर नलीचंच.

शंकाच नको. तिचंच हे काम ! पण तिला हे कळलं कसं ? म्हणजे काल संध्याकाळी आपल्याला गॅरेजच्या बाहेर पावलं वाजल्याचा भास झाला तो भास नव्हता तर ! हीच गधडी लपून बसली होती. किती वेळ बसली होती ? तिने आपलं काय काय ऐकलं असेल ?

अजयच्या मनात नाना शंका आल्या. नली उठली की तिला छेडायला हवं असे ठरवून त्याने आधी पाणी लावून लावून आरशावरची चिठ्ठी काढून टाकली आणि तो आपल्या खोलीत आला तो काय ?

खुर्चीच्या पाठीवर, टेबलावर, कॅलेंडरवर सगळीकडे चिठ्ठया डकव-लेल्या होत्या, ' अजबगजब मंडळ झिंदाबाद ! '

आता मात्र अजयचा राग अनावर झाला. नली उठेपर्यंतही त्याला धीर धरवेना. तो धावत तिच्या खोलीत गेला. पण त्याला कळेना—नलीने हा उद्योग केलान् कधी ? बहुधा आपल्याला झोप लागल्यावर केला असला पाहिजे. तरीच रात्री टेबललँपशी बसून वाचीत होती. वाचन कसलं ? ढोंग होतं ते. गधडी आपल्याला झोप लागायचीच वाट पाहात होती. वाचनाची येवढी आवड आहे कुठं ? एरवी तर डोळ्यापुढे पुस्तक धरलं की झोप येते हिला !

नली तोंडावरून पांघरूण घेऊन झोपली होती. अजयनं खसकन् तिचे पांघरूण काढून बाजूला केले आणि तिला घुसळीत विचारू लागला,

" नले, बोल आधी ! कुणाचं हे काम ? "

नली खरं म्हणजे कधीच जागी झाली होती. झोपेचे सोंग घेऊन ती अजयची गंमत बघत होती. पण अजयने घुसळले तेव्हा जाग आल्याचे सोंग करून ती म्हणाली,

" अज्या, उगीच छळू नकोस हं मला उजाडल्यापासून. झोपू दे मला ! "

" मोठी आली झोपणारीण ! करून सवरून वर सांव. आधी सांग, त्या चिठ्ठया कुणी डकवल्या ? "

" कसल्या चिठ्ठया ? आपण नाही रे बाबा ! आपल्या कानी सात खडे ! "

" अस्सं काय ! कुठल्या कानात ते दाखवू का ? " अजयने तिचा कान पकडीत विचारलं.

" ओय ओय—अरे, कान सोड. आई ग ऽ —"

" वाट बघ आई येतीय. रडूबाई कुठली ! सांग आधी, तूच काल

संध्याकाळी चोरून ऐकत होतीस का नाही आणि मग तूच पळालीस ना ?"

"मी – मी – आई ग –"

"काय काय ऐकलंस ? आणखी कुणाकुणाला सांगितलंस ते कबूल कर आधी, नाहीतर बघ–" अजय नलीला अगदी बुकलून काढण्याच्या भरात आला होता. तोच दारावरची घंटा वाजली आणि उघडलेल्या दारातून आत पाऊल टाकताच मधूकाका गरजला,

"अरे, अजून अंथरुणातच का तुम्ही ? आणि मारामारी काय चालली आहे ?"

अजयचा हात एकदम खाली आला.

"काही नाही, काका. बसा ना. आम्ही आलोच तोंड धुऊन."

आता अजयला भीती पडली की ही कार्टी काकाला आपलं सगळं गुपित सांगेल म्हणून. काकाला हे असलं काही आवडत नाही. मुलांनी कसं शिस्तीत, शहाण्यासारखे वागावे. लवकर उठावे आणि फक्त खूप अभ्यास करावा हे मधूकाकाचे लाडके मत होते. त्यामुळे दरवेळी मधूकाका आला की मुलांना एक उपदेशाचा डोझ पाजत असे. नली, अजय दोघांनाही ते आवडत नसे. पण करतात काय ? त्यातही आई–बाबा जाताना काकाला सांगून गेले होते ना 'मुलांच्यावर नजर ठेवा' म्हणून ?

"काका बघा हो, हा अज्या—" काकाला पाहताच नलीला जोर चढला.

"नले, काकांना यातलं काही सांगशील तर बघ. गप्प बैस अगदी." अजयने नलीला हलक्या आवाजात पण जरबेच्या सुरात दटावले.

आत्तापुरता तरी नलीचा विजय झाला होता. तिने विचारले, "तह ?"

"हो."

“ अट सांगू ? ”

“ सांग. ”

“ मला तुमच्यात घ्याल ? मग नाही सांगणार. आहे कबूल ? ”

नलीची हीच अट असणार हे अजयला माहीतच होते. त्याने गज्याला सांगितलेही होते की तिला घ्यायचं पण लिंबूटिंबू म्हणून. तोच विचार करीत अजय म्हणाला,

“ कबूल. ”

“ नक्की ना ? ”

“ हो, नक्की— पण लिंबूटिंबू. ” अर्थात शेवटचा शब्द अजयने मनातच उच्चारला.

“ मग नाही सांगणार. ”

“ उठ तर. पुढे हो —काकाबरोबर दूध प्यायला. मी त्या सगळ्या चिठ्या काढून टाकून येतो. ”

अजयने भराभरा आपल्या खोलीत जाऊन सगळ्या चिठ्या खरवडून टाकल्या आणि तो बाहेर काकाजवळ येऊन बसला. मधूकाकाने त्याच्या अभ्यासाची चौकशी करून नेहमीप्रमाणे व्याख्यान दिले. सुट्टीचा वेळ आळसात न घालवता वाचन कसे केले पाहिजे; त्याची टिपणे घेतली पाहिजेत. इंग्रजी सुधारण्यासाठी रोज साठ शब्दांचे स्पेलिंग कसे पाच-पाचदा घोटून काढले पाहिजे; आपले कपडे कसे व्यवस्थित घड्या करून जागच्या जागी ठेवले पाहिजेत, इत्यादी इत्यादी— बरेच काही तो बोलला. अजयला चहा फार आवडायचा. आईने ट्रिपहून परत येईपर्यंत सुट्टीत सकाळी एकदा चहा प्यायची परवानगी अजयला दिली होती, पण अजयने चहाचा कप भरताच काकाने पुन्हा एक लेक्चर सुरू केले आणि त्याला तो कप आत नेऊन दुधाचा कप भरून आणायला सांगितला.

अजय जाम वैतागला. पण करतो काय! मुकाट्याने कप घेऊन उठला. त्याची पाठ वळताच काका ओरडला,

"अरे, पाठीवर चिठ्ठी कसली तुझ्या? तुम्ही काय सर्कशीतली विदूषकं आहात का रे पाठीवर चिठ्ठ्या डकवायला?"

अजयच्या एकदम लक्षात आले. गधडीने पाठीवरही चिठ्ठी लावली आहे. काकाला चष्म्याशिवाय दिसत नाही म्हणून बरं.

"छे, कुठं काय? आलोच हं मी दूध घेऊन" असे म्हणून तो सटकलाच. जाताजाता रागाचा एक जळजळीत कटाक्ष त्याने नलीकडे टाकला.

काहीच न घडल्यासारखी नली कपात चमचा ढवळीत होती.

□

## ४. पहिली मोहीम

अजबगजब मंडळाची स्थापना होऊन चार दिवस झाले नाहीत तो मंडळाला एक कामगिरी मिळाली. अगदी आपणहून चालत आली म्हणाना.

"भिरभिरं" हा परवलीचा शब्द सगळीकडे फिरला आणि भास्कर, बुलुंद, गजा हे तिघेही अजयकडे जमले. भास्करने आज आपल्या जिगरलाही बरोबर आणले होते.

"का रे अजय, आज घरात अगदी शुकशुकाट दिसतोय?"

"अरे, म्हणून तर मीटिंग घरात ठरवली. चला आत जेवणाच्या टेबलापाशीच बसूया सगळे."

“ काय ठेवलंय का रे आईनं डबे भरून जाताना ? ” बुलुंदने शोधक नजरेने सैपाकघरातल्या डब्यांकडे नजर टाकीत विचारले.

“ आहे ना ! अगदी भरपूर आहे. पण बुलुंद, आपलं काय ठरलं आहे ? काम आधी. खादीकार्यक्रम नंतर. ”

“ का रे अज्या, नली कुठाय ? ती टपकली म्हणजे ? ” गज्याने विचारले.

“ अरे, ती आज काकूंच्याबरोबर त्यांच्या पुतणीच्या लग्नाला गेली आहे. दोन दिवस यायची नाही. हरीला पण सुट्टी दिलीय. तो त्याच्या गाववाल्याकडे गेला आहे. ”

“ मग गज्या, आज आपलंच राज्य आहे तर ! ”

“ पण गज्या, नलीला आपल्या मंडळाचं सभासद करून घ्यावं लागणार. ”

“ ती चिचुंद्री काय काम करणार ? ”

“ ते खरं रे—पण तिला आपल्या मंडळाबद्दल कळलंय. त्या दिवशी पावलांचा आवाज झाला म्हणून मी म्हटलं. तुम्ही मला वेड्यात काढलंत. भास झाला असेल म्हणालात. पण हीच गद्धी होती तिथे. चोरून ऐकत होती. अर्थात आपण हळूहळू बोलत होतो ते काही तिला ऐकायला गेलं नाही, पण शेवटी आपण ‘ अजबगजब मंडळ झिंदाबाद ’—असं जोरात ओरडलो ना ते ऐकलन् आणि मग—” अजयने पुढचा चिठ्ठया चिकट-वल्याचा सारा प्रकार सांगितला आपल्या दोस्तांना; आणि चिडून म्हणाला,

“ काय करू रे, मधूकाका त्या वेळी मधे आला नसता ना तर चांगली बुकलून काढली असती ढमीला. पण मधूकाकासमोर तोंड गप्प ठेवावं लागलं आणि तिला मंडळात घ्यायचं कबूल करावं लागलं. ”

“ असू दे रे. तिचासुद्धा उपयोग होईल एखादवेळ ? कुणी सांगावं.

डिटेक्टिव्ह मृत्युंजयला नाही का त्याची ती बाहुलीसारखी छोटी सेक्रेटरी लीना मदत करायची ? तो तर तिला डॉलच म्हणतो की ! आणि आपण तर ह्या टिल्लया जिगरलासुद्धा सभासद करून घेतलंय की ! " भास्कर म्हणाला.

" लिंबूटिंबूच आहे ती नाहीतरी. देऊ बारीकसं काम. भास्कर, आता आधी तू काय कामगिरी आणली आहेस ते सांग पाहू ? " गज्या म्हणाला.

सगळेच उत्सुकतेने कान टवकारून बसले. जिगर सगळ्यांच्या पायां-मधून हुंगत, अंग घाशीत हिंडत होता. त्यालाही भास्करने एक टपली मारून स्वस्थ बसायला सांगितले, आणि तो म्हणाला,

" ऐका, मंडळी ! आपलं मंडळ फारच चांगल्या मुहूर्तावर स्थापन झालं आहे. लगेचच एक काम करण्याची संधी आली आहे. कामात साहस आहे, चातुर्य आहे, कल्पकता आहे—"

" ए, मालगाडी नको. एक्सप्रेस जाऊ दे. "

" आमच्या ' नीलकमल ' शेजारीच एक सहकारी सोसायटी आहे हे तुम्हाला माहीत आहेच. तिथे दिघे म्हणू एक गृहस्थ राहतात. सध्या त्यांची बदली दिल्लीला झाली आहे. त्यांचा ब्लॉक त्यांनी माझ्या दादाचा मित्र देसाई याला वापरायला दिला आहे. अज्या, तुला माहीतच आहे तो. आपल्याबरोबर त्या दिवशी पिक्चरला आला होता तो.— तर हा देसाई एकटाच राहतो. तो मेसमधे रात्रपाळीला जातो आणि सकाळी कॉलेजला जातो. सध्या कॉलेजला सुट्टी आहे— म्हणजे तसा दिवसभर बाहेरच असतो. गेले ७।८ महिने तो तिथे राहतो आहे, पण गेल्या महिनाभरात त्याच्या घरातून काही वस्तू चोरीला गेल्या आहेत—"

चोरी म्हटल्यावर सगळेच सावरून बसले.

" त्याच्या घरातल्या गड्यानंच चोरल्या असतील. "

" नाही. कारण एक म्हणजे त्याच्याकडे गडी नाहीच. तो हातानेच करतो आणि मुख्य गोष्ट अशी की तो बाहेर जातो तेव्हा चोरी होते. तरी घराचं बाहेरचं गोदरेजचं अंगचं कुलूप आणि त्याशिवाय कडीला घातलेलं मोठं दुसरं कुलूप जसंच्या तसं असतं."

" खिडकीतून कुणी आत येत असेल." बुलंद म्हणाला.

" तीही शक्यता नाही. कारण एकतर तो तिसऱ्या मजल्यावर राहतो आणि दुसरं म्हणजे तो जाताना सगळ्या खिडक्या पक्क्या बंद करून जातो. कारण नाहीतर कबुतरं घरात शिरून घाण करतात."

" चोरी कसली होते ? खाण्याच्या पदार्थांची असेल तर उंदीर मांजर सुद्धा असेल" गज्या म्हणाला.

" थांब रे ! त्याला पुरतं बोलू दे ना ? तुम्ही उगीच मधे मधे बोलू नका."

" खाद्यपदार्थांची तर चोरी होतेच, पण एकदोनदा पैसे, घड्याळ, पेन अशाही वस्तू गेल्या आहेत."

" घराची दुसरी चावी आणखी कुणाजवळ आहे ?"

" नाही. एक चावी दिघ्यांनी आपल्याबरोबर नेली आहे दिल्लीला."

" मग हा देसाईच कुठेतरी चावी विसरत असेल."

" मुळीच नाही. ती नेहमी त्याच्या खिशात असते."

" नवल आहे. मग घराला बाहेरून कुलूप असताना आतल्या वस्तू जातात कशा ?"

" भुताटकी किंवा भानामती नसेल ना ? आमच्या भीमसेनवाडीत मागे एका घरात असे भानामतीचे प्रकार व्हायचे. अरे दांडीवरच्या दांडीवर कपडे जळायचे काय, भरलेल्या घागरी जागा सोडून अंगणात काय यायच्या. तसं काही असेल तर ते काम आपल्याच्यानं व्हायचं नाही अज्या. त्याला मांत्रिकच आणावा लागतो."

“ तू गप रे बुलुंद. उगीच काहीतरी बोलून फाटे फोडू नकोस. सोसायटीत कशाला कोण भानामती करील ? ”

“ पण मग वस्तू जातात कशा ? ”

“ तेच तर आपल्याला शोधून काढायचं आहे. हे सगळं तुला कसं कळलं भास्कर ? ” अजयने विचारले.

“ अरे, काल तो आमच्या घरी जेवायला आला तेव्हा सांगत होता. त्याने पाळत ठेवायचा प्रयत्न केला, पण त्याला काही जमलं नाही. कारण तो चार दिवस घरी होता तर काहीसुद्धा झालं गेलं नाही. पण पाचव्या दिवशी संध्याकाळी तो बाहेर पडताच त्याचं पार्करचं पेन नाहीसं झालं. ”

“ चोर हुशार दिसतो. ”

“ तर रे ! आणखी एक गोष्ट म्हणजे देसाई आता दोनचार दिवसांत ती जागा सोडतो आहे. प्रेसच्या जवळच त्याला खोली मिळाली आहे. पण इथून जाण्यापूर्वी चोर सापडायला हवा असं त्याला वाटतंय. ” थोडे थांबून, सगळ्यांच्याकडे एकवार पाहून भास्कर पुढे म्हणाला.

“ मी त्याला सांगितलं की देतो पकडून तुझा चोर. साला जातो कुठे ? ”

“ असं म्हणालास ? ”

“ मग ? ” छाती फुगवून भास्कर म्हणाला.

“ तू त्याला आपल्या मंडळाबद्दल सांगितलंस ? ”

“ सगळं नाही सांगितलं, पण माझे दोनतीन मित्र आहेत त्यांच्या मदतीने आज ना उद्या तुला चोर पकडून देतो अशी दादासमोर पैज मारली. ”

“ माझ्या हातांत सापडला तर असा बुकलीन— ” बुलुंद मुठी आवळीत म्हणाला.

" पण आधी सापडायला हवा ना ? कसा पकडणार ? "

" तेच तर ठरवायचं आहे आपल्याला. अजय, तू आमचा म्होरक्या आहेस ना ? काढ ना शोधून मार्ग ? "

" सगळ्यांनीच विचार करा रे. "

" अज्या, आपण तिथे फाटकाशी पहारा करीत बसलो तर– " गज्याने आयडीआ काढली.

" अरे, पण सोसायटीत काय एकटा देसाईच राहतो का ? चोवीस बिऱ्हाडं आहेत त्यातली पन्नास पाऊणशे माणसं रोज जा-ये करणार– कसा ओळखणार त्यातनं तू त्याला ? "

" मग समजा आपण त्याच्या बिल्डिंगच्या जिन्यात दबा धरून बसलो तर–– " भास्कर म्हणाला.

" म्हणजे चौथ्यापाचव्या मजल्यावर राहणारे लोक तुम्हालाच पकडून पोलिसच्या हवाली करतील. जिन्यात दबा धरून बसल्यावर त्यांना नाही का दिसणार ? का रात्रीचा लपंडाव खेळतोय म्हणून सांगणार त्यांना ? "

" समजा, त्यांच्या घराच्या दरवाजाला धोक्याची घंटा बसवली तर चोराने दार उघडताच सूचना मिळेल ! " बुलंदचे डोके चालले.

" कुठे ? भीमसेनवाडीत तुझ्या घरी का ? आणि घंटा कोण बसवणार ? साधा फ्यूज तरी बसवता येतो का ? उगीच त्या झोटिंग कथा वाचून काहीतरी बडबडू नकोस. "

" तुझ्या मृत्युंजयपेक्षा झोटिंग कसा दमदार आहे. कमावलेलं शरीर आहे त्याचं – असा अंगावर घेतो शत्रूला. "

" पण भेजा कुठं आहे त्याला ? सरळसोट ऊठ की झोड एवढंच माहिती आहे त्याला. कसल्या माला वाचतोस– काही दम आहे का त्यांत ? " गज्या करवादला.

" अरे तुम्ही भांडायला जमलात का इथे ? गज्या, बुलुंद, एकदम स्टॉप ! "

" मग काय करायचं रे अज्या ? मी तर त्या देसाईला छातीठोकपणे सांगून आलोय चोर पकडून देऊ म्हणून. बेट मारली आहे. आता नाही जमलं तर दादा आणि तो केवढी टिंगल करतील माझी ! " भास्कर रडवेला होऊन म्हणाला.

" अरे, असा हातपाय काय गाळतोस लगेच ? थोडा विचार करू दे मला. सुचेल काहीतरी. आता दोन मिनिटं कुणीही काही बोलू नका हं. मी विचार करतो " असे म्हणून अजय दोन्ही हातांत डोके धरून डोळे मिटून बसला. अंगठ्याने कानशिले दाबू लागला.

ही खास मृत्युंजयची स्टाईल होती. कानशिले दाबली की त्याला बरोबर मार्ग दिसायचा. अजयनेही तसेच केले.

सगळेच गप्प बसलेले पाहून जिगर कुत्रा उठला आणि इकडे तिकडे हुंगत हिंडू लागला. हॉलमधेच त्याला एक टेनिसचा बॉल मिळाला; त्याबरोबर जिगर खूष झाला. चेंडू तोंडात धरून तो धावतच भास्करपाशी आला आणि त्याच्या पुढ्यात चेंडू टाकून त्याला खुणवू लागला की ' चल खेळायला. ' भास्करने काहीच लक्ष दिले नाही तेव्हा जिगरने भुंकायला सुरुवात केली.



" शू चूप रे ! " भास्करने त्याला दटावले तरी जिगर ऐकेना, तेव्हा भास्करने चेंडू टाकला. जिगरने धावत जाऊन तो पकडला. पण तेवढ्यात त्याचा धक्का लागून पितळी फुलदाणी खाली पडली. तिचा आवाज झाला ' टण् ण् ण् ! '

त्याच क्षणी दोन्ही हातांतले डोके वर उचलून अजय ओरडला, " सापडला...सापडला ! "

" कोण–चोर ? कुठं आहे, दाखव ! " बुलंद म्हणाला.

" अरे मार्ग सापडला. चोराला पकडण्याचा. गड्यांनो एक आयडीआ सुचली आहे. भास्कर, देसाई अजून फक्त दोनच दिवस इथे आहे हे त्या चोराला माहीत आहे का ? "

" विचारून येतो. "

" कुणाला ? "

" चोरालाच. "

यावर सगळेच हसले.

" तसं नव्हे, भास्कर. मला काय म्हणायचं आहे की ज्या अर्थी देसाई बाहेर गेल्यावरच चोर येतो त्या अर्थी चोराला देसाईच्या सगळ्या हालचालींची माहिती असली पाहिजे. तसेच चोरी संध्याकाळी ७ ते रात्री १० च्या दरम्यान होते, तेव्हा चोर दिवसा कुठेतरी गुंतलेला असला पाहिजे, आणि देसाई दोन दिवसांत इथून हलणार हे माहीत असलं तर आज उद्या एवढ्यातच तो त्याच्या जागेत पुन्हा नक्की धाड घालील. चोर तिथलाच जवळपास राहणारा असला पाहिजे. तेव्हा आता आपण असं करायचं– "

" कसं ? " सगळ्यांनी एका सुरात विचारले.

" देसाईचा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे ना, भास्कर ? "

" हो. "

" त्याच्या घराची किल्ली तो तुझ्याजवळ देईल ? "

" नक्की. "

" पण तसं नकोच. आपल्याजवळ किल्ली कशी म्हणून कुणी विचारलं तर– " डोळे बारीक करत अजयने पुन्हा विचार केला.

" भास्कर ! देसाई प्रेसला किती वाजता जातो ? "

" सात सव्वासातला जातो. वाटेत खाणावळीत जेवून पुढे जातो. "

" आज जाणार आहे ? "

" हो, आज आणि उद्या. सामान हलवायचं म्हणून परवा त्याने रजा घेतली आहे. "

" मग दोस्त, आपण असं करायचं, आज आणि उद्या दोन्ही दिवस आपण भास्करबरोबर त्या देसाईच्या घरी जायचं. देसाई कामावर जाण्या-पूर्वी दोघांनी त्याच्या घरात शिरायचं, आणि दोघांनी खाली पहारा द्यायचा. आत गेलेल्या दोघांना घरात कोंडून देसाईने रोजच्या वेळेला बाहेर पडायचं आणि नेहमीप्रमाणे दाराला बाहेरून कुलूप घालायचं आणि कामावर जायचं– "

" पुढे ? "

" पुढे आत राहिलेल्या दोघांनी दबा धरून बसायचं. ज्या अर्थी कुलूप कायम राहून चोरी होते त्या अर्थी चोराजवळ आणखी एक किल्ली असली पाहिजे. देसाई जाणार हे चोराला माहिती असेल तर तो आज उद्या आल्याशिवाय राहात नाही. तेव्हा तो दार उघडून आत आला रे आला की आत असलेल्या दोघांनी त्याला पकडून ठेवायचं आणि खुणेची शीळ घालायची की लगेच खाली पहाऱ्यावर असलेल्या दोघांनी देसाईला आणि पोलिसाला खबर द्यायची –"

" वाहवा ! छान !! आयडीआ पण आयडीआ ! अज्या, काय डोकं आहे रे तुझं — " गज्या टाळी वाजवून म्हणाला.

" पण समजा--चोर आलाच नाही तर? तुम्ही किती वेळ दबा धरून बसणार ?" भास्करला शंका आलीच.

" तो एक चान्स आहे. असे चान्स ह्या साहसात घ्यावेच लागतात. पण माझी खात्री आहे की चोर तिथे आल्याशिवाय राहात नाही. देसाई ही गोष्ट आणखी कुठे बोलला आहे का रे भास्कर?" अजयनं विचारलं.

" नसावा. फक्त तुम्हालाच सांगतोय असं म्हणाला. कारण तो राहतो तिथे त्याची कुणाशीच ओळख नाही."

" ठीक. गज्या; आत्ता किती वाजले आहेत ?"

" चारला दहा मिनिटं कमी आहेत ?"

" भास्कर, तू पुढे जा. देसाईला गाठून आपली योजना सांग आणि त्याला पसंत असेल तर आम्हाला लगेच इशाऱ्याचा फोन कर. आम्ही बरोबर सात वाजता तिथे येतो." अजय म्हणाला.

" हा मी निघालोच." साहसाच्या कल्पनेने भास्करच्या अंगात वारे शिरले. तो तसाच खुर्ची सरकवून उठला. त्याला बसवीत अजय म्हणाला,

" अरे थांब, थोडं खाऊन जा ना !"

" छे छे ! अज्या. आता आधी चोराच्या हातात बेड्या आणि मग आमच्या तोंडात वड्या !" 'आधी लगीन कोंडाण्याचं' म्हणणाऱ्या तानाजीच्या आवेशात भास्कर म्हणाला आणि उठून चालायला लागला. त्याच्या पाठोपाठ जिगरही निघालाच.

" शाबास रे गब्रू !" त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप देत गज्या म्हणाला, " तू हो पुढे. आम्ही आलोच."

☐

## ५. चोर पकडला !

भास्कर गेल्यानंतरचा वेळ त्या मंडळींनी ताणलेल्या अवस्थेत काढला. बटाट्याचे वेफर, बिस्किटे, रव्याच्या वड्या, शंकरपाळे इत्यादी पदार्थांचा एकीकडे फडशा पाडत असतानाच ते एकमेकांत चर्चा करीत होते. तरीपण सगळ्यांचेच कान अजयच्या फोनकडे लागले होते.

" भास्कर गेलाय पण देसाई भेटेल का रे त्याला ? " गज्याने शंका काढलीच.

" आणि भेटला तरी तो आपली योजना मान्य करील का ? सगळीच मोठी माणसं म्हणतात तसा पोरासोरांची म्हणून हसण्यावारी तर घालव-णार नाही ? "

इतक्यात फोनची घंटा वाजली. हातातला घास टाकून गज्या, बुलंद धावले. एकटा अजय जाग्यावर बसून राहिला.

" हॅल्लो !—" बुलंदने गज्याच्या आधी फोनला हात घालून रिसिव्हर उचलला. गज्या शक्य तितका बुलंदला चिकटून उभा राहिला. फोनवरचे बोलणे ऐकू यावे म्हणून.

" हॅल्लो ? हूम डू यू वॉंट ?—अरे आपको कौन मंगता है ? —कौन परेरा ? इथे कुणी नाही परेराबिरेरा. रॉंग नंबर ! " बुलंदने दणकन् फोन आदळला. दोघेही टेबलाकडे परतले.

" काय धावलात उठून वेड्यासारखे ! अरे, भास्कर अजून पोचला-सुद्धा नसेल " अजय म्हणाला.

" बल्या—लेका, आख्खं इंग्रजी वाक्य बोललास की एका दमात ! " गज्या म्हणाला, " आणि तेसुद्धा करेक्ट. "

" बक अप् लेका ! बरीच प्रगती आहे. "

" अज्या, तुला काय वाटतं ? भास्करचं काम फत्ते होईल ? त्याचा फोन येईल ? "

अजयने काहीच उत्तर दिले नाही. तो विचारात गढला होता.

थोड्या वेळाने पुन्हा फोनची घंटा घणघणली. थोडा वेळ कुणीच उठेना. मग अजयने खूण केली तेव्हा गज्या उठून फोनपाशी गेला. त्याने रिसिव्हर उचलून कानाला लावला आणि पलीकडचा आवाज ऐकताच बोलण्याच्या जागेवर हात दाबून तो ओरडला,

" अज्या, नलीचा फोन ! "

अजयने पटकन् उठून त्याच्या हातातला फोन घेतला.

" काय करतो आहेस ? फोन घ्यायला वेळ का लागला ? घरात कुणी आहे वाटतं ? "

" हो, आहे ना ! "

" कोण ? "

" चार म्हशी आल्या आहेत. त्यांनाच वेसण घालीत होतो म्हणून वेळ लागला. तुझ्याच खोलीत बांधल्यात. "

" अज्या, सरळ बोल. "

" सरळच बोलतोय. जरा बोलायला उशीर झाला तर उलटतपासणी घ्यायला तू काय डिटेक्टिव्ह मृत्युंजय लागून गेलीस ? लाडू तोंडात होता म्हणून वेळ लागला बोलायला. "

" मग तसं सांगायला काय झालं ?—हे बघ, काकूंनी सांगितलं आहे ओट्याखालच्या कपाटात तुझ्यासाठी दही विरजून ठेवलं आहे ते फ्रिज-मध्ये टाक. म्हणजे आंबट व्हायचं नाही आणि रात्री ते संपवून टाक. "

" हं. "

" हरीला दारं नीट लावायला सांग आणि रात्री फार जागू नको. घड्याळाला किल्ली दे. "

"व्यरं."

"अज्या, तुमच्या मंडळाची मीटिंग कधी आहे?"

"मीटिंग? — हो हो, मीटिंग ना, घेऊ ना आता."

"मला घेणार आहेस ना नक्की?"

"हो तर."

फोन खाली ठेवून अजय परत टेबलापाशी आला. घड्याळाचा काटा हलत होता, पण वेळ पुढे सरकतच नाही असे सगळ्यांना वाटत होते.

"अज्या, आपण कॅरम तरी खेळू या तंवर. कंटाळा आला बसून बसून."

"नको बुवा, त्यातसुद्धा लक्ष लागायचं नाही. आपण सगळ्यांनीच जायला हवं होतं भास्करबरोबर. काम झालं नसतं तर निदान भटकंती तरी झाली असती. नुसतं इथं बसून माश्या मारण्यापेक्षा—" बुलुंद म्हणाला.

—अखेर पुन्हा एकदा फोनची घंटा वाजली. या वेळी मात्र भास्करचाच आवाज होता. अजयनेच फोन घेतला. इशाऱ्याचा शब्द 'भिरभिरं' ऐकू आला.

"हं बोल." अजयचा चेहरा उजळलेला पाहून गज्या, बुलुंद खुर्च्या सरकवून उठले.

"हो ...हो ...हो, निघतोच" अजयने फोन ठेवला आणि म्हणाला, "मंडळी चला, भास्करने आपलं काम चोख बजावलं आहे. पहिला टप्पा तरी यशस्वी पार पडला. देसाईला आपली योजना एकदम आवडली. आपल्यासाठी तो खायलाही काय काय आणून ठेवणार आहे म्हणे. आणि चोर सापडला तर मोठ्ठं बक्षीस देणार—"

गज्या आणि बुलुंद एकमेकांच्या हातावर टाळ्या देत नाचू लागले. काहीतरी साहस करायला मिळणार म्हणून त्यांनाही आनंद झाला.

" थांबा रे. नाचू नका इतक्यात. अजून पुढचा बेत पार पडायचा आहे. मी कपडे करतो आणि लगेच निघूच. गज्या, बुलुंद, तुमच्या घरी कळवायला हवं ना. एखादेवेळ उशीरही होईल—"

" मी आज तुझ्याकडेच झोपणार असं सांगून आलोय. आपलं तसं ठरलंच होतं ना." गज्या म्हणाला.

" आणि मी मित्राबरोबर रात्री सिनेमाला जाऊन येईन असं सांगून आलोय. आपली मीटिंग एखादवेळ लांबेल असं मला वाटलंच होतं म्हणून पहिलेच सांगून टाकलं. साले मग वांधे नकोत."

" ठीक. आजच बहुधा आपलं काम फत्ते व्हावं. नाहीच जमलं तर उद्या घरी काय थाप मारायची ते नंतर ठरवू. चला आता--क्विक मार्च—"

भास्करच्या घराच्या नाक्यावर पावणेसात वाजता तिघेही बसमधून उतरले. कोपऱ्यावरच्या इराण्याच्या हॉटेलपाशी भास्कर उभा होताच. चौघेही लगेच सहकारी सोसायटीकडे निघाले. तिसऱ्या मजल्यावरच्या देसाईच्या जागेत आले. येतायेता चौकसपणाने त्यांनी आजूबाजूला न्याहाळले. घराघरातून रेडिओचे आवाज येत होते. परतलेल्या भाज्यांचे, लसणीच्या खमंग फोडणीचे वास जिन्यातून दरवळत होते. एकूण घराघरातील मंडळी जेवणाखाण्यात मग्न होती. कुणी आलेगेले इकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. आधीच ब्लॉकमध्ये दारे बंद झाली की कुणाचा कुणाला पत्ता लागत नाही. आतातर मुलेही घरात परतली होती. फाटका-वरचा गुरखाही आपल्या छोट्या खोलीत स्टोव्हला पंप करण्यात दंग होता. त्याच्या खोलीला जोडून एक बैठी चाळ होती.

" इथे जवळपास राहणारा कुणीतरी देसाईवर पाळत ठेवून असेल. त्यामुळेच देसाई गेला की येत असेल. कदाचित समोरच्या इमारतीत

राहणाराही कुणीतरी असेल. पण समोरच्या बिल्डिंगमधे आणि या सोसायटीतही सगळी चांगलीच माणसं राहतात" असं भास्कर म्हणाला.

जिना चढता चढता अजय विचार करीत होता.

भास्करने पुढे होऊन दारावरची बेल वाजवली. एका तेवीस-चोवीस वर्षांच्या तरुणाने दार उघडले. त्याने कल्ले वाढवले होते आणि नाकावर जाड भिंगांचा चष्मा होता. तसा तो बावळटच वाटला.

"या, या" त्याने हसून स्वागत केले आणि अजबगजब मंडळाला आत घेतले.

आत शिरताच अजय आणि गज्याने त्या सगळ्या ब्लॉकचे निरीक्षण केले. दारातून आत शिरले की उजव्या हाताला बसायची खोली ऊर्फ हॉल. त्याला पूर्वेकडे एक भलीमोठी खिडकी. पण या खिडकीला पक्के गज होते. त्यातून कुणी आत येण्याची शक्यता नव्हती. या खोलीला एकच दार आणि एकच खिडकी. दाराच्या समोरच सैपाकघराचं दार आणि त्याला जोडून गॅलरी. या गॅलरीलाच आणखी एक दार बेडरूम-मध्ये नेणारे. बेडरूमचं दुसरं दार सैपाकघराला लागून पॅसेजमध्ये उघडणारे. बेडरूमच्या दोन खिडक्या पण त्याही गजांनी पक्क्या केलेल्या. नाही म्हणायला पुढची गॅलरी मात्र मोकळी होती. पण तिथे आसपास एकही पाईप नव्हता की ज्याच्यावरून आत चढून येणे सोपे जावे. दोन पाईप होते ते बाथरूमला लागून, पण त्यांवरूनही चढून येणे शक्य नव्हते. कारण त्याच्या खिडक्या आडव्या काचेच्या पट्ट्या लावून बंद केलेल्या होत्या.

पुढच्या खोलीत सामानसुमान असे फारसे नव्हतेच, कारण देसाई एकटाच राहात असे. एक टेबल, एक पुस्तकाचे शेल्फ, दोन घडीच्या खुर्च्या, एक टेबलावरचा पंखा एवढेच सामान होते. आतल्या बेड-रूममध्ये एक लोखंडी कॉट, कपड्यासाठी एक लाकडाचे कपाट आणि

दिघ्यांचे एक कुलूप लावून बंद केलेले गोदरेजचे कपाट.

— या कपाटाला मात्र किल्लया लावून कधी उघडण्याचा प्रयत्न केलेला दिसत नव्हता. त्यावरून चोर वरवर दिसेल ते चोरून जाणारा म्हणजे 'भुरटा' असावा असे मत अजयने व्यक्त केले. सैपाकघरात तर फारसे काही नव्हतेच.

सगळ्या खोल्या हिंडून अजयने पुढे काय करायचे याचा अंदाज बांधला आणि तो परत बसायच्या खोलीत आला. तोवर देसाईने कामा-वर जायचे कपडे घातले होते.

"गड्यांनो, माझी निघायची वेळ झाली. तुम्ही सगळेच आत राह-णार का?" त्याने विचारले.

"नाही, आमच्यापैकी दोघे आत राहतील आणि दोघे बिल्डिंगच्या खाली एका बाजूला अंधारात दडून बसतील." अजय म्हणाला.

"मी राहतो आत" भास्कर म्हणाला.

"नाही, भास्कर!" अजयने निर्णय दिला. "आतमधे माझ्याबरोबर बुलुंद राहील. तो ताकदीने चांगला आहे. तुम्ही दोघं खाली उतरून थांबा. ते गॅलरीच्या खाली गॅरेज दिसतं आहे ना त्याला लागून सिनेमाची भिंत आहे. तिथे आडोशाला उभे राहा. गज्या, देसाईंच्या प्रेसचा फोन नंबर लिहून घे. देसाई, समजा आम्हाला चोर सापडलाच तर आम्ही तुम्हाला फोन करू. तुम्ही लगेच पोलिसला घेऊन या."

"ठीक आहे, दोस्त हो, तुमची साहसी वृत्ती पाहून मला फार आनंद झाला. तुम्हाला तुमच्या कामात यश मिळो. हे पहा, सैपाक-घरात ओट्यावर चिवडा आणि बर्फी ठेवली आहे आणून. नळाला पाणी आहे. माठात प्यायचं पाणी आहे. तुम्हाला कॉफी करून दिली असती पण आता मला उशीर होईल."

"नाही. कॉफी नकोच. तुम्ही निघाच आता. जाताना नेहमीसारख्या

खिडक्यादारं पक्की बंद करून जा. भास्कर, गज्या, तुम्ही खाली जाऊन थांबा. खुणेची शीळ आली की वर या. नीट लक्ष ठेवा."

"बरं, येतो" म्हणून देसाईने नेहमीसारख्या खिडक्या बंद केल्या, दिवे मालवले आणि तो भास्कर व गज्यासह बाहेर पडला. कांपाउंडला लागून असलेल्या सिनेमाच्या भिंतीपाशी भास्कर व गज्याला सोडून तो आपल्या वाटेने कामाला निघून गेला.

देसाईने बाहेरनं कुलूप लावल्यावर नाही म्हटलं तरी अजयला थोडी भीती वाटलीच. पण ती न दाखवता तो बुलुंदला म्हणाला,

"काय बल्या, घाबरला तर नाहीस ना?"

"अरे हट्! उलट मारामारी करायला माझे हात कसे शिवशिवताहेत. सापडू दे तर साल्याला नावडीत–"

"किती वेळ बसावं लागेल इथे, कुणास ठाऊक!"

अंधारातच उठून दोघंही या खोलीतून त्या खोलीत हिंडू लागले. घरात बाईमाणसांचा वावर नसल्याने ते घर बरेच दिवसांत वरून झाडलेले नव्हते. साहजिकच पाली, कोळिष्टके, झुरळे यांचा मुक्त संचार होता. दोघे हिंडत असताना वरून एक पाल पटकन् बुलुंदच्या खांद्यावर पडली. त्याबरोबर बल्या ओरडला आणि त्याने पटकन् भिंतीवर चाचपडून दिवा लावला.



“गाढवा! दिवा काय लावतोस?” लगेच बटन ऑफ करीत अज्या ओरडला. “एवढंसं तर पालीचं पिल्लू. किती घाबरलास? आणि म्हणे मी मारामारी करणार. ए हे रे–”

“अज्या, माणसांशी मारामारी करू आपण हवी तेवढी, पण ह्या पालीझुरळांची किळस वाटते बघ–”

“बरं, बल्या, आता आपल्याला काहीतरी ठरवायला हवं. आपण दबा धरून कुठे उभं राहायचं?”

“कुठे म्हणजे, मुख्य दरवाजाला लागून.”

“ए हे रे, आणि दार किलकिलं करताच, त्याला समजा– आपली पावलं दिसली किंवा अंगावरचे पांढरे कपडे दिसले आणि त्याला नुसता संशय आला तरी तो मागच्या मागे पळून जाईल की!”

“आपण दोन बुरखे घ्यायला हवे होते गड्या.”

“कुठून आणणार होतास?”

“मिळाले असते की फातिमाचाचीकडे. अज्या, समजा, तो चोर मोठा दांडगा असला तर–”

“का, तुझ्या अंगात ताकद आहे ना?”

“ते खरं रे, पण त्याच्या हातात सुराबिरा असला तर? आमच्या गल्लीत मारामाऱ्या होतात ना तर ते लोक बोलता बोलता चाकूसुऱ्या काढतात.”

“हा मुद्दा लक्षातच आला नाही की रे! आपण तर साधी फूटपट्टी-सुद्धा आणली नाही. थांब, ह्याच्या सैपाकघरात कुठे सुरीवगैरे सापडते का पाहू.”

“अंधारात कशी शोधणार?”

“खरंच की! थांब, मघाशी मी ओट्यावर काड्याची पेटी पाहिली होती. त्यातल्या काड्या ओढून शोधू. त्याचा उजेड काही एवढा बाहेर

नाही जाणार. " अजय म्हणाला.

दोघेही अंधारात चाचपडत सैपाकघरात गेले. चाचपडता चाचपडता ओट्यावरच्या एका भांड्याला धक्का लागून ते खाली पडले आणि मोठा आवाज झाला. दोघेही दचकले. चोराने आवाज ऐकला तर– पण पेटी सापडली. अजयने काड्या ओढायला सुरुवात केली. ओट्याखालच्या कपाटात, ओट्यावर, फळीवर, कुठेच सुरी दिसेना. ·एकामागून एक काड्या संपत होत्या.

" ही शेवटची काडी हं बल्या ! जाऊ दे आता. "

" ओढून टाक रे ती. बघू शेवटचा प्रयत्न. "

अजयने शेवटची काडी ओढून ओट्याला लागून असलेल्या मोरीत धरली. तिथे नळाखाली सुरी पडली होती.

" अरे, सापडली ती बघ ! " अजय ओरडला.

बुलुंदने ती उचलून घेतली, पण तिला काहीच धार नव्हती.

" ह्यः, ही काय उपयोगाची ? लोणीसुद्धा कापलं जायचं नाही यानं." हातावर फिरवीत बुलुंद म्हणाला. त्याने सुरी परत खाली टाकली.

" बल्या, आता आपण असं करूया– बेडरूमच्या आणि गॅलरीच्या भिंतीला पाठी लावून उभे राहू. समजा, त्याच्या हातात सुरा असला आणि तो आपल्याला भारी आहे असं वाटलं तर चोर आत येताच आपण पळून जायचं. समजा, तो इकडनं म्हणजे सैपाकघरातनं आत शिरला तर आपण बेडरूममधून दार उघडून पळायचं आणि तो आधी बेडरूममध्ये शिरला तर सैपाकघरातनं पसार व्हायचं. हे बघ, इकडे ये मी दाखवतो तुला. " डिटेक्टिव्ह अजयने त्याला गॅलरीत नेऊन पळायचे कसे याचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

" हां, हे ठीक. पण तो बसायच्या खोलीत आधी शिरला तर ?– "

" अरे मग सोपंच. तो आत गेला की त्या खोलीचं दार पटकन्

ओढून देऊ. त्या खोलीला एकच दार आहे हे विसरलास वाटतं ? ”

“ खरंच की रे ! पण हा चोर येणार कधी ? मघाशी भांड्याचा आवाज ऐकून पळून गेला नसेल ना ? ”

“ कदाचित येणारच नाही की. आपल्याला नक्की कुठं काय माहीत आहे ? हे एक जाळं टाकलं आहे. मासा गळाला लागला तर पाहायचं.”

“ अज्या, तंवर आपण थोडा चिवडा खाऊया का रे ? भूक लागली बघ.” अंधारातच ओट्यावरचा चिवड्याचा डबा उघडीत बुलुंद म्हणाला.

“ चालेल. ”

डबा उघडून बुलुंदने चिवड्याची मूठ तोंडात भरली तोच बाहेरच्या पॅसेजमध्ये पावलांचा अस्पष्ट आवाज झाला. सावध असलेल्या अजयला तो लगेच ऐकू आला.

“ शू ऽ ” बल्याचा हात दाबीत तो हलकेच म्हणाला, “ आवाज येतोय. ”

त्या पाठोपाठच कुलपात किल्ली फिरवल्याचा आवाज आला. विजेच्या वेगाने अजय–बुलुंद ओट्यापासून दूर झाले आणि ठरलेल्या ठिकाणी दबा धरून बसले.

कडी सरकली. गोदरेजच्या कुलपात किल्ली फिरली आणि हलकेच दार उघडले गेले. भिंतीला चिकटूनच पण किंचित डोके पुढे करून गॅलरीच्या दाराच्या फटीतून अजय पाहात होता. आत येताच हलक्या हातानेच पुन्हा त्या व्यक्तीने दरवाजा बंद केला. स्वतःशीच अस्पष्ट शीळ घालीत ती व्यक्ती बाथरूममध्ये गेली.

अजय–बुलुंदनी एकमेकांकडे पाहिले. अजय हलकेच म्हणाला,

“ बल्या, अगदीच पोरगेलासा दिसतोय. ”

“ पण सराइतासारखा वावरतोय. मजेत शीळ घालतोय. ”

“ कुणी नाही घरात याची खात्री आहे ना ? ”

" अज्या, पकडायचा ना ? "

" हो तर ! "

" ठीक. बेडरूममध्ये आला तर तू इकडून पुढे हो. मी त्या दारानं त्याला घेरतो. सैपाकघरात आला तर तू तिकडून दारात ये. "

" बरं, गप्प. पाण्याचा आवाज बंद झाला बघ. "

बाथरूममधून बाहेर येऊन त्या व्यक्तीने दाराला अडकवलेल्या रुमालाला तोंड पुशीत सरळ सैपाकघर गाठले. आधी पोटपूजा करण्याचा त्याचा विचार असावा. सैपाकघरातला दिवा लावून त्याने लगेच बंद केला. तेवढ्यात त्याला ओट्यावर चिवड्याचा उघडा डबा दिसला. दाराकडे पाठ आणि ओट्याकडे तोंड करून त्याने अंधारातच डब्यात हात घातला आणि मूठभर चिवड्याचा बोकाणा भरला.

इतक्यात अजयने बेडरूममधून येऊन पटकन् सैपाकघराचा दिवा लावला आणि बल्या अस्तन्या सरसावून गॅलरीच्या दारात उभा राहिला.

एकदम उजेड झाल्यामुळे त्या व्यक्तीने तोंड फिरवले आणि दोन दारांत दोन मुलांना पाहून तो घाबरला. तोंडात चिवडा भरलेला असल्याने त्याला काही बोलताही येईना. तो नुसताच तत– पप— करीत राहिला.

चोर व्यक्ती अगदीच काटकुळी लहान निघालेली पाहून अजय–बुलुंदला जोर चढला. तो घाबरलेला पाहून अजयला त्याची फिरकी घ्यायची लहर आली. बुलुंदकडे पाहून डोळे मिचकावीत त्याच्या पाठीवर थाप मारीत तो म्हणाला,

" काय दोस्त, एकटेच खाता ? "

" त् त्.... तुम्ही कोण ?— इथं कसे ? "

" जसे तुम्ही, तसेच आम्ही ! "

" म्हणजे तुम्ही पण— "

" हो. पण राव तुम्ही सराईत दिसता. अगदी घरच्यासारखे वावरताय की ! "

आता त्या व्यक्तीची भीती कमी झाली. व्यक्ती कसली ? खरं म्हणजे तोही एक पोरगाच होता. अजय बुलुंद्च्याच वयाचा असेल, पण अंगाने अगदीच किरकोळ.

" मग काय तर ? मी इथला नेहमीचाच, पण तुम्ही कसे आलात ? "

" तुझ्यासारखेच. "

" तुमच्याकडे पण किल्ली आहे ? अवदुल्लाकडनंच करून घेतलीत की काय ? "

" द्या टाळी ! तुला पण त्यानंच दिली ना ? या धंद्याला खरा डोक्याचा माणूस तोच ! "

" तर काय ? नुसता मेणाचा ठसा दिल्याबरोबर दोन दिवसांत करून दिली. "

" साल्या, तू तर इथलं सगळंच धुऊन नेलेलं दिसतंय. आम्हाला काहीच ठेवलं नाहीस. मघापासून शोधतोय पण एक फुटकं पेनसुद्धा मिळालं नाही. "

" अरे पेन, घड्याळ तर कधीच गायब केलं आहे या पठ्याने. आज ट्रान्झिस्टरवर धाड होती माझी. साला परवा जागा सोडून जाणार आहे ना ? "

" वा, तुला अगदी बित्तंबातमी दिसते आहे ! कुठे जाणार आहे ? "

" जहन्नममधे का जाईना ! आपल्याला आज ट्रान्झिस्टर मिळाल्याशी कारण. शंभर रुपयाला तरी मरण नाही. दुसरा बकरा मिळेपर्यंत खूप झाले. पण साल्यांनो, तुम्ही घेतलात की काय ट्रान्झिस्टर ? तिसरा हिस्सा मला मिळायला हवा. "

" अस्सं ? " अजय म्हणाला, " बरं, कबूल. त्या बसायच्या खोलीत

आहे. तूच वीक आणि आम्हाला हिस्सा दे. कबूल ? "

" हो, चालेल. यापुढेसुद्धा तुम्ही मला साथ द्याल ? अरे, आपण धमाल करून सोडू ! "

" जरूर. बरं, तू तो घेऊन ये तोवर आम्ही हा चिवडा खातो. "

तो मुलगा बसायच्या खोलीत शिरल्याबरोबर बुलंदने त्याला धक्का दिला आणि तो कोलमडताच पटकन् त्या खोलीचे दार बाहेरून लावून घेतले. कडी घातली. चोर आत कोंडला गेला.

आपल्याला दगा झाल्याचे लक्षात येताच तो चोर धावत दाराशी येऊन दाराला धडका मारू लागला.

" बस साल्या आता आताच मालक येईपर्यंत त्या ट्रान्झिस्टरवरची गाणी ऐकत. ये दुनिया चोरोंकी है— "

" अरे अरे ! मला बाहेर काढा रे. दोस्त, आपण एकच आहोत ना? मी तुमच्यासारखाच— " तो ओरडला.

" चूप बे ! भलतंच बोलू नकोस. " बल्याने त्याला जामले, " आम्ही चोरीचं काम नाही करीत, तर चोर पकडायचं काम करतो. "

" आम्ही चांगल्या घरची मुलं आहोत. देसाईनेच आम्हाला आत बसवून बाहेरून कुलूप लावलं होतं. तुला पकडायसाठी सापळा लावला होता आम्ही " अजय म्हणाला.

" मीसुद्धा चांगल्या घरचाच आहे रे. अरे, माझ्या वडिलांना कळलं तर मला फोडून काढतील ते ! मला सोडा. जाऊ दे. चुकलो. पुन्हा नाही असं करणार. " तो मुलगा अगदी रडकुंडीला आला.

" चांगल्या घरचा असून अशी कशी इच्छा झाली तुला ? भोग आता शिक्षा. आम्ही चाललो पोलिसात वर्दी द्यायला. "

" अरे, नाही रे ! पुन्हा मी असं करणार नाही. अगदी देवाशपथ, आईच्या गळ्याशपथ– पण– प– प. .पोलिसांना नका रे कळवू. तुम्ही

हवं तर चार थोबाडीत द्या माझ्या " तो गयावया करीत म्हणाला.

" काही उपयोग नाही मिस्टर आता. तुला पकडून देण्याचं आमचं काम संपलं. आता तू जाणे आणि तो देसाई जाणे. बल्या, भास्करला शीळ घाल. " अजय म्हणाला.

बुलुंदने गॅलरीत जाऊन दोन्ही बोटे तोंडात घालून जोराची शीळ घातली. दोन मिनिटांतच दोघेही दारात हजर झाले.

" भास्कर, काम फत्ते ! तुझा चोर या खोलीत कोंडला आहे. देसाईला फोन कर पटकन्. "

" अज्या, अज्या ! बाप रे अगदी धमाल केलीस की ! " भास्करने अजयला चक्क मिठी मारली.

" खरंच का आत चोर आहे ? " गज्याने बल्याचे खांदे घुसळीत विचारले.

" दाराला कान लावून तूच ऐक ना " बल्या म्हणाला.

" आता रडतंय. घाबरून रटाट झालंय रे ! बापाला सांगू नको म्हणतंय. "

" असं ? कोण आहे रे ? " दाराला कान लावून आतले मुसमुसणे ऐकत गज्याने विचारले.

" कोण जाणे, पण चांगल्या घरचा पोरगा आहे म्हणतोय. भास्कर, कदाचित तू ओळखशील त्याला. इथला जवळपास राहणाराच असावा. गड्यांनो, किती वाजले ? आपल्याला घरी पळायला हवं, नाहीतर हरी चुगली करील. शेवटची बसही थोड्या वेळात गेली की आपल्याला मिळायची नाही.

" भास्कर, तू इथलाच आहेस. तेव्हा सगळी सिच्युएशन तू ताब्यात घे. आता आपण सगळेच बाहेर पडू आणि दाराला बाहेरून कडी घालू. खाली उतरलो की— भास्कर, तू देसाईला फोन कर. मी सगळं सांगतो.

देसाई येईपर्यंत तू इथंच थांब खाली. चोर त्याच्या स्वाधीन कर. पोलिसातच द्या."

"खरं म्हणजे आपणच पोलिस चौकीवर फोन करायला हवा; अज्या!"-भास्कर

"अरे, घर देसाईचं, आपण कसे फोन करणार? आणि आपलं पोरांचं म्हाणणं कोणता पोलिस ऐकून घेईल? भंकस म्हणेल नि सोडून देईल." अजय म्हणाला.

"आणि तुम्ही तिथं कसे गेलात? आत काय करत होतात असं त्यांनी विचारलं तर? तुम्ही त्याचेच साथीदार नाही कशावरून?— नको बाबा ती पोलिसाची कटकट! साक्षीला काय बोलावतात, पंच-नाम्याला काय बोलावतात— मला माहीत आहे ना आमच्या वाडीतलं. पोलिसांचं झेंगट मागे लागलं की साला वैताग!" बुलुंद म्हणाला.

"खरं आहे बल्या म्हणतो ते." गज्या म्हणाला.

"पण भास्कर, देसाईला सांग त्याला तसा सोडू नको. पोलिस चौकीवर चांगले फटके खाऊन चार दिवस हवा खाऊन येऊ दे."

## ६. ही छोटी मुलगी कोण?

देसाईच्या घरचा चोर पकडून दिला या साहसाची नशा अजब-गजब मंडळावर चांगलीच चढली. नंतरचे आठदहा दिवस त्यांना तो विषय पुरला. येताजाता तीच चर्चा. मुलाचे वडील हातापाया पडल्यामुळे देसाईने त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले नव्हते. नुसताच दम भरून

सोडून दिले. ही गोष्ट अजबगजब मंडळाच्या सभासदांना मुळीच आवडली नव्हती. आज गज्याच्या घरी जमले असताना देखील त्यांच्यामधे तीच चर्चा चालली होती.

" बाकी अज्या, तुझं डोकं म्हणजे अगदी धमाल हं !" बुलुंदने त्याच्या पाठीवर जोराची थाप मारीत म्हटलं, " मानलं तुला गड्या ! "

" पहिल्याच झटक्यात मासा गावला. "

" अगदी डिटेक्टिव्हच्यावर ताण केलीस. कसं सुचलं रे तुला ? " गज्या म्हणाला.

" अरे, त्याला भेजा आहे म्हणून तर आपण त्याला म्होरक्या केलाय ना ? आपल्यासारखी ही....ही....भजी नाहीत नुसती डोक्यात कोंबलेली कांद्याबटाट्यांची. " पुढ्यातल्या कांद्याच्या भज्यांवर ताव मारीत भास्कर म्हणाला.

" काही म्हण पण देसाईने त्याला असा सोडायला नको होता. खरं म्हणजे आपल्याच वयाचा तो मुलगा– "

" आणि त्याच्या समोरच्याच बिल्डिंगमधला. बाप चांगला ऑफिसर आहे म्हणे रे."

" अरे, समोर होता म्हणूनच देसाई केव्हा येतोजातो ह्याची पाळत ठेवणं सोपं गेलं त्याला. त्याच्याच घराखालनं देसाई रोज जायचा नं– "

" पण मेणाचा ठसा घेऊन किल्ली वगैरे तयार करून घेण्यापर्यंत त्याची मजल गेली म्हणजे अगदी ग्रेट हं– "

" अरे, तयारच झाला होता तो ! देसाईच्या घरची चोरी ही काही त्याची पहिलीच चोरी नव्हे. यापूर्वीही कॉलनीत कुणाकुणाच्या वस्तू गेल्या आहेत; पण हा चांगल्या घरचा मुलगा. कसा संशय यावा ? आणि आला तरी बोलून कोण दाखवणार ? "

" पण आपण मात्र त्याला मुद्देमालासकट पकडून दिला की नाही ?

खरंच यार, काय धमाल मजा आला त्या दिवशी."

"आपण त्याला खोलीत कोंडल्यावर त्याचा चेहरा कसा झाला असेल रे? फोटो घेता आला असता तर–"

"अरे घाबरून रटाट झाला होता. देसाईनं त्याला बाहेर काढलान् ना तर अक्षरशः चड्डी ओली झाली होती!" भास्कर म्हणाला.

"देसाईला आपलं किती कौतुक वाटलं, नाही? देशाला आज अशाच मुलांची गरज आहे म्हणत होता."

"आणि 'सतलज'मधे नेऊन खायलाप्यायला काय मस्त घातलं रे! शिवाय प्रत्येकाला एक एक पेन बक्षीस दिलंन्." बुलुंदला अजूनही ती चव आठवत होती.

"पण ही मोठी माणसं म्हणजे लेकाची हीच! येवढं आम्ही साहस केलं तर घरी बक्षीस काय मिळालं माहीत आहे, अज्या?" भास्कर वैतागाने म्हणाला, "पिताजींनी एक मोठ्ठं लेक्चर सुनावलं, आणि आई-साहेबांनी खरडपट्टी काढली. म्हणे असले उद्योग कुणी सांगितले आहेत? नसते जिवाशी खेळ. एक करता एक झालं असतं म्हणजे– आम्ही म्हणजे नुसता पुस्तकातला किडा असावं असं वाटतं त्यांना. एकटा दादा तेवढा खूष झाला."

"गड्यांनो, एका कामगिरीत तरी आपण यशस्वी झालो. पण आता इथंच थांबून उपयोगी नाही. डिटेक्टिव्ह मृत्युंजयसारखं एकामागून एक साहस करीत राहिलं पाहिजे. अजून आपले सुट्टीचे पंधरा दिवस शिल्लक आहेत. आमचे आईबाबा यायला अजून आठदहा दिवस अवधी आहे तोवर आणखी एखादं काम आपण हातावेगळं केलं पाहिजे." अजय म्हणाला.

"पण करणार काय?" बुलुंदने विचारले.

"काय म्हणजे? अरे, शोधात राहायचं. शोधा म्हणजे सापडेल. इथं

इतके गुन्हे रोज घडतात त्यातलं एकही नाही का सापडणार आपल्या?" अजय म्हणाला.

" भास्कर, तू आण रे आणखी एखादं– "

" वा रे वा ! मीच काय मक्ता घेतला आहे ? आता माझी पाळी झालीय. "

" अरे, पाळ्या कसल्या लावता ? " अजय समजुतीच्या सुरात म्हणाला, " हे बघा, माझ्या डोक्यात एक योजना तयार झाली आहे ती मी तुम्हाला सांगतो. उद्यापासून आपल्यापैकी प्रत्येकाने एकेक ठिकाण वाटून घ्यायचं आणि मग टेहेळणी करायची. "

" टेहेळणी किल्ल्याच्या बरुजावरून करतात ना रे ! मग कुठे वसईच्या किल्ल्यावर जायचं का ? " बुलुंदचे डोके चालले.

" किल्ला कशाला हवा ? आणि त्या ओसाड किल्ल्यात काय मिळणार ? " गज्या.

" असं म्हणू नकोस हं. या लोकांची लपण्याची, कट रचण्याची गुप्त ठिकाणं अशाच जागी असतात. पण आत्ता आपण जी पाळत ठेवायची ती गर्दीच्या ठिकाणी. म्हणजे रेल्वेचे प्लॅटफॉर्म्स, चौपाटीवरची संध्याकाळची गर्दी, सिनेमाची थिएटर्स, बाजार– प्रत्येकानं एकएक ठिकाण वाटून घ्यायचं. सकाळ-संध्याकाळ टेहळणी करायची आणि काही संशयास्पद दिसलं की 'भिरभिरं' हा परवलीचा शब्द फिरवायचा आणि– "

" कुठे जमायचं ! तुझ्या घरी त्या गॅरेजमधे का ? "

" नको, एक तर नलीला ती जागा माहीत झाली आहे आणि दुसरं म्हणजे एकदोन दिवसांत आमची मोटार दुरुस्त होऊन तिथे येईल. आपण जमायचं आमच्या बिल्डिंगमधेच. पण या वेळी दहाव्या मजल्यावरच्या गच्चीवर पाण्याच्या टाक्या आहेत ना त्याच्या खाली. तिथं दुपारी कुणी

येत नाही. " अजयने सांगितले.

" नलीला सभासद करून घेतलं आहेस ना ?" भास्करने विचारले.

" घेतलं आहे रे, पण लिंबूटिंबू ! म्हणजे अगदीच जरूर पडली तर बारीकसं काम सांगायचं. तसं तुझ्या जिगरलाही घेतलं आहेच की ! खरं का नाही दोस्त ?" जिगरच्या पाठीवर थोपटत गज्या म्हणाला. जिगर खुषीत आला. त्याने आपले तोंड गज्याच्या तोंडावर घासले.

" जिगरचं एक बरं आहे. आपलं काही गुप्त त्याने ऐकलं तरी तो ते कुणाजवळ फोडणार नाही."

" चला मग. ठिकाणं वाटून घ्या आणि कामाला लागा. बल्या, तू कुठे जाणार ?"

" आमच्या वाडीजवळ सिनेमाची चारपाच थिएटरं आहेत. तिथं मी उभा राहीन." बुलुंद म्हणाला.

" ठीक. भास्कर तू ?— तुझ्या घरापासून रेल्वे स्टेशन जवळ आहे. तिकडे तू जा."

" बरं."

" गज्या, तुला समुद्र आवडतोच. तिथल्या गर्दीत तुला कदाचित साहस मिळेल."

" येस, सर !" अटेन्शनच्या पोझमधे उभा राहून गज्या म्हणाला.

" आणि अज्या तू रे ?"

" मी ना— अं ऽऽ— मी तुमच्यापैकी प्रत्येकाबरोबर एक एक दिवस राहीन ना."

" चालेल."

— बेत पक्का ठरवून अजय, भास्कर, बुलुंद तिघे गज्याच्या घरून निघाले. नवीन साहस करायचे या कल्पनेचे वारे अंगात सळसळत होते. त्यांना वाटत होते— चोर गुन्हेगार पकडणं काही कठीण नाही. लोकं

उगीच घाबरतात. थोडंसं डोकं वापरलं की झालं. अज्यानं काय छान डोकं लढवलं !

नव्या साहसाच्या वेगवेगळ्या कल्पना करीतच मंडळी पांगली आणि घरी जाऊन झोपली. झोपेत प्रत्येकाला आपण एक एक चोर पकडल्याचे स्वप्न पडत होते.

पण मंडळाने काम अंगावर घेऊन आठवडा व्हायला आला तरी कुठेच काही हालचाल दिसत नव्हती. समुद्रावर लोक मजेत हिंडत होते. कुणाचेच पाकीट चोरीला जात नव्हते. रेल्वेच्या डब्यातून चेंगराचेंगरीत एकमेकाला रेटीत लोक प्रवास करीत होते; पण कुणाच्या गळ्यातली साखळी चोरीला जात नव्हती. सिनेमाच्या थिएटरपाशी तर पोलिस बंदोबस्त वाढला होता त्यामुळे लोक बहुतेक फिरकतच नव्हते.

एक एक दिवस जायला लागला तसा मंडळाचा उत्साह कमी व्हायला लागला. सुट्टी संपत आली. अजयचे आईवडील काश्मीरहून परत यायची वेळ जवळ येत चालली तरी काही घडेना.

एक दिवस सकाळी चहा पिऊन अजय वर्तमानपत्र घेऊन दिवाणखान्यात कोचावर तंगड्या पसरून वाचीत होता. व्हिएतनाम युद्ध--



ओरिसा मंत्रिमंडळ गडगडले— पंतप्रधानांचा परदेश दौरा— शिव-चरित्राचे चित्रप्रदर्शन— काश्मीरच्या मुख्य प्रधानांचे भाषण— भुत्तोचे प्रलाप—

त्याच त्याच नेहमीच्या बातम्या. कंटाळून त्याने पेपर बंद करून बाजूला टाकला आणि दोन्ही हात डोक्याखाली घेऊन तो विचार करू लागला. " काय करावं....सहा दिवस झाले. काही संधी मिळत नाही..."

त्याने टाकलेला पेपर नलीने केव्हाच उचलून घेऊन उघडला होता. नलीला अर्थातच पहिल्या पानावरच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, आंतर्देशीय बातम्यांत काहीच रस नव्हता. तिने सरळ दुसरे पान उघडून सिनेमाच्या जाहिराती वाचायला सुरुवात केली.

" अय्या, अय्या, शशिकपूरचा ' जानवर और इन्सान ' लागलाय ' बिजली 'ला. ए, चल ना रे आज दुपारी. "

" सिनेमाशिवाय तुला दुसरं काही दिसतं का ग ? सारखं, राजेश खन्ना, देव आनंद, शर्मिला, मुमताज—बस ! आणि मग त्यांनी केलेल्या फॅशन्स, आज ह्या नटीची— उद्या त्या नटीची. .. "

" असू दे. आणि तू नाही वाटतं राजेश खन्नाचा गुरू शर्ट घेतलास ? अमिताभच्या हातात त्या सिनेमात आहे तसला घड्याळाचा पट्टा आणि हातात कडं....आणि ती हरेराम हरेकृष्णाची मोठ्या पदकाची साखळी ! गळ्यात एक सोन्याची साखळी आहे तरी लोखंड घालायची हौस. आई त्या दिवशी रागावली म्हणून— "

" तरीपण तुझ्याइतकं नसतं आमचं. आज काय राखीनं केसाची बट अशी वळवली की तमाम पोरींनी आपली बट वळवलीच. काय म्हणे साधना कट केस कापायचे. परवा तुझ्या मैत्रिणीची ती बहीण आली होती.... बापरे काय दिसत होती !.. कसली हेअर स्टाईल... जळमटं झाल्यासारखे सगळे केस फिस्कारले होते. तू लागलीच निघालीस

तसं करायला. आई बाहेर गेलेली पाहून सगळे केस उस्कटलेस. पण कंगव्यात बसलेलं एक झुरळ शिरलं केसांत आणि मग एका मुलीनं असं काही कथ्थक केलं आहे — वा ऽ त्या रेगे सिस्टर्ससुद्धा त्यापुढे फिक्या! खरंच नले, त्या दिवशीचे तुझे फोटो घ्यायला हवे होते बघ–"

"अज्या, अज्या, बघ हं चिडवशील तर! नसलं यायचं तर नको येऊस सिनेमाला. आमचं काही अडलं नाही खेटर!" नलीनं हातपाय आपटीत म्हटले, "काही करू नकोस आमच्याबरोबर. सिनेमाला नको येऊ, फिरायला नको नेऊ, मंडळात घेऊ नको— थांब, आता आई आली की— "

"अग, पण घेतलंय ना तुला सभासद करून." .

"हो; नुसतं सांगतोस, पण कधी बोलावलंस का मला तुमच्याबरोबर? त्या दिवशी तो चोर पकडला तेव्हा मला पत्ता तरी लागू दिलास का?"

"त्या दिवशी तू होतीस कुठे? तुम्ही बसा लग्न नि बारशी करीत. नवी मॅर्गा न् मॅक्सी न् गरारा घालून मिरवायला हवं ना? असतीस इथं तर नेली असती. सगळंच मुळी अचानक ठरलं आणि साहस असं एकदमच करायचं असतं, ते काही काकूंसारखं पंचांग पाहून ठरवीत नाहीत. कुठल्या क्षणाला आपल्यापुढे काय येईल त्याचा नेम नाही. मात्र आलं की लगेच उडी घ्यायची असते त्यात. आणि तू भागूबाई तिथं येऊन काय करणार होतीस? एक झुरळ अंगावर चढलं तरी नाचायला लागतेस, ता थै, तक थै—"

"अज्या–अज्या! बघ हं–" आता नली खरं म्हणजे रडकुंडीला आली होती. तेवढ्यात फोनची घंटा वाजली म्हणून बरं, नाहीतर दोघांचे पानपत जुंपायला वेळ लागला नसता.

"तो फोन घे जा आधी" अजय म्हणाला.

"माझं अडलंय, तू घे जा हवा तर. असेल तुझ्याच गज्याबज्याचा.'

" तुझ्याच मैत्रिणींचा असेल. उठल्यापासून उद्योग काय? नले, तू उठलीस? नले, तू चहा प्यायलीस! नले, आज कसला ड्रेस करणारेस? रिबन जांभळी का निळी?— अय्या....होक्का....इश्श....जा गडे...." अजय नक्कल करीत म्हणाला.

" अज्या, अजिटल्या खापिटल्या " नली बेबीच्या देठापासून चिडून ओरडली, पण तितक्यात तिला आठवलं की तिची खास मैत्रीण शमिका आज खरंच सकाळी फोन करीन म्हणाली होती. वज्रेश्वरीची काहीतरी गंमत सांगणार होती. नलीनं ताडदिशी उठून फोन घेतला आणि हलक्या नाजूक आवाजात म्हणाली,

" हॅलो ऽ " ही स्टाईल तिनं अलीकडेच उचलली होती.

" मी आत्या बोलते आहे. कोण नलिनी का? "

" हो. "

" बरंबिरं नाही की काय तुला? आवाज का येवढा खोल येतोय?"

" अय्या! आत्या, तू?" नली नेहमीच्या आवाजात म्हणाली, " मी ओळखलाच नाही तुझा आवाज. नाही— चांगली आहे की. रात्री ना? हो, रात्री जेवले होते की— "

" अजय काय करतोय? "

" अज्या ना– "

" नलिनी, किती वेळा सांगितलं तुला की नीट अजय म्हणत जा म्हणून. "

" हं. आत्या, तो ना, आहे की इथंच. "

" हे बघ, आज मदालसेचा वाढदिवस आहे. तुम्ही दोघं दुपारी इकडे या. पुष्कळ मुलं बोलावली आहेत. तुम्ही लवकर या. फुलांच्या माळा करायच्या आहेत. फुगे बांधायचे आहेत. तू छान लावशील माळा. फुलांची रांगोळीपण काढ. "

"आत्या, खरंच ? कित्ती मजा येईल ! पण आम्ही येणार कसे ?"

"का बरं ? गाडी आली ना तुमची रिपेअर होऊन ?"

"हो, कालच आणली मधुकाकांनी मेकॅनिककडून गाडी, पण ड्राय-व्हर कुठे आहे ? आमचा कृष्णा रजेवर आहे."

"असं होय ? बरं, मी श्रीकाकाला सांगते येताना तुम्हाला घेऊन यायला. चार वाजता तयार राहा." आत्याने फोन खाली ठेवला.

"अजय, आत्याचा फोन आला होता." फोन ठेवून दिवाणखान्यात नली नाचतच आली. आत्याकडे जायचे या आनंदात ती मघाचे भांडण विसरूनच गेली. आज दिवस मजेत जाणार म्हणून ती खुषीत आली होती. "अजय—"

पण अजयचे तिच्याकडे लक्षच नव्हते. नली फोन घ्यायला गेल्यावर अजयने चाळा म्हणून पुन्हा तो पेपर हातात घेऊन चाळायला सुरुवात केली आणि एका बातमीने त्याचे लक्ष वेधून घेतले. दोन इंचाच्या एका चौकटीत एका छोट्या मुलीचा फोटो छापला होता आणि खाली लिहिले होते—

"बटरफील्ड रोडवर राहणारे श्री. सुवदेंदु रॉय आणि श्रीमती दलिका रॉय यांची दोन वर्षांची मुलगी गौरी ही काल संध्याकाळपासून बेपत्ता आहे. याबाबत हकीगत अशी की, बुधवारी संध्याकाळी श्रीमती दलिका रॉय या आपल्या मुलीला बाबागाडीत घालून बाजारात खरेदीला गेल्या होत्या. डिंपल बाजार या विविध वस्तूंच्या दुकानाबाहेर बाबागाडी उभी करून त्या आत वस्तू घेण्यासाठी गेल्या. तिथे त्यांना त्यांची मैत्रीण मिता परेरा भेटली. एकीकडे तिच्याशी गप्पा मारीत त्यांनी खरेदी केली आणि दोघीही बाहेर आल्या. बाबागाडी जाग्यावरच होती, पण आत गौरी नव्हती ! तपास करूनही पोलिसांना रात्रीपर्यंत ती मिळाली

नाही. तिला कुणीतरी पळवून नेली असावी असा संशय आहे. मुले पळवणारी एक टोळी त्या भागात वावरते आहे अशी हूल असल्याने त्या भागात घबराट उडाली आहे. पोलिस तपास चालू आहे.

—वरील फोटोतील मुलगी अगर तिच्यासंबंधी माहिती कुणी देऊ शकेल त्याला मोठे इनाम देण्यात येईल."

अजय त्या मुलीच्या फोटोकडे एकटक पाहात राहिला. विचारी !— किती गोड आहे ! केस कसे छान दाट कुरळे आहेत. नाक नकटं आहे. जपानी बाहुलीसारखी दिसते आहे नलीच्या.— आपल्याला ह्या मुलीचा पत्ता लावता आला तर ? पण हा बटरफील्ड रोड कुठं आला ?

"अज्या, ऐकतो आहेस ना ? अरे लक्ष कुठं आहे तुझं ? आत्याचा फोन आला होता. आपल्याला बोलावलं आहे तिनं. मदालसाचा वाढदिवस आहे आज. दोन वर्षांची झाली आज. खूप मुलं बोलावणार आहे."

"गौरीसुद्धा दोन वर्षांचीच होती." अजय पुटपुटला.

"कोण गौरी ? काय पुटपुटतो आहेस ?"

"फालतू बडबड नाही करीत. हे वाच जरा" तिच्यापुढे पेपर सरकवीत, त्या चौकटीवर बोट ठेवीत अजय म्हणाला. नलीनेही ती बातमी वाचली.

"अयाई ग ! म्हणजे आपल्या मदालसेएवढीच की रे. किती वाईट वाटलं असेल तिच्या आईला ? आपल्याला घरी यायला थोडा उशीर झाला तर आई किती काळजी करते – कुठे रे नेली असेल तिला ? कुणी ? काय करतील रे तिचं ?"— नलीने प्रश्नावर प्रश्न टाकले. त्यांची उत्तरे अजयला तरी कुठे माहीत होती ?

इतक्यात "आंघोळीचं पाणी काढलंय" असे सांगत हरी आला आणि तो विषय तिथेच राहिला.

आत्याकडे जाण्याच्या आनंदात नंतर नली ते विसरूनही गेली. पण अजयमात्र दुपारभर त्या बातमीचाच विचार करीत होता. अजबगजब मंडळाची मीटिंग घेऊन त्याच्यापुढे हा विषय ठेवायला हवा. पण कधी जमायचं? आजची संध्याकाळ तर आत्याकडे जाईल. उद्या दुपारी बोलवावं. परवलीचा शब्द फिरवला पाहिजे.

दुपारी ठीक चारच्या ठोक्याला श्रीकाका हजर झाला. अजय, नली तयार होतीच. नलीने आज बनारशी खणाचा परकरपोलका घातला होता. आत्याकडे जायचं होतं ना? तो तिला छान दिसत होता. खरं म्हणजे नलीला काहीही छान दिसायचे. तशी ती सुरेखच होती. चणीने मात्र अगदी लहान, नाजुक म्हणून तर अजय तिला लिंबूटिंबू म्हणायचा.

श्रीकाकाच्या गाडीत बसून दोघेही आत्याच्या घरी गेले. श्रीकाका गाडी मस्त चालवायचा. उपनगरात आत्याचा छोटासा पण छान बंगला होता. भोवताली नाना तऱ्हेची फुलझाडं लावलेली होती. मागच्या अंगणात नारळ, पेरू, जांभळाची झाडे होती. तिथे गेल्यावर मुले खूष झाली. आत्याने वाढदिवसाचा थाट मोठाच उडवून दिला होता. वेगवेगळे खेळ आयोजित केले होते. बागेतला झोपाळा फुलांनी सजवला होता. त्यावर बसून मदालसेचे कितीतरी फोटो काढले श्रीकाकाने. दिवाण-खान्यात फुलांच्या माळा, रंगीबेरंगी फुगे, मुलांनी लावलेच होते. चांदीच्या फुल्या मारलेल्या लाल रंगाच्या पाटाभोवती नलीने फुलांची रांगोळी काढली. नलीला लहानपणापासून रांगोळ्या काढायचा नाद होता आणि काढायचीही छान. तिच्या नाजुक हाताची लांबसडक बोटे कलावंताची होती. मदालसेला पाटावर बसवून पाच बायकांनी निरांजनाने ओवाळले. आणि मग सगळ्या मुलांनी तिच्यावर वाढदिवसांच्या भेटींचा वर्षाव केला.

अजय-नलीनीही एक सुरेख खेळणे तिला दिले. ती पोरगीपण दोन्ही हातांनी टाळ्या वाजवून, खुषीत हसत होती. बोबडे बोलत होती. एक खेळणे उचलीत होती. एक टाकीत होती. तिच्याकडे बघता बघता अजयला एकदम गौरीची आठवण झाली. त्याने एकदम आत्याला विचारले,

" आत्या, बटरफील्ड रोड कुठे आला ग ? "

" कुठला म्हणालास ? मी तर हे नावही कधी ऐकलं नाही. श्रीकाकाला विचार. कशाला हवाय ? " आत्या म्हणाली.

पण श्रीकाकालाही तो रस्ता माहीत नव्हता. जास्त चौकशी नको म्हणून अजय गप्प बसला.

—संध्याकाळपर्यंत झकास कार्यक्रम झाला. मुले घरोघर गेली. मोठ्या माणसांचीही खाणीपिणी झाली आणि अजय-नली श्रीकाकाच्या मोटारीतून पुन्हा परत घरी निघाली. आता दोघांनाही मरगळ आली होती. भरपूर खाणे आणि खेळणे यामुळे नलीला तर खरं म्हणजे झोपच यायला लागली होती. आता घरी गेलं की एकदम अंथरूण गाठायचं.

" हे काय काका, इकडे कुठे चाललो आपण ? " गाडी घराच्या रस्त्याला न लागता दुसरीकडे निघाल्याचे पाहून अजयने विचारले.

" इथून जवळच एक गृहस्थ राहतात. पार्डीकर म्हणून. त्यांच्याकडे थोडं काम आहे ते करून येतो आणि मग तुम्हाला सोडतो म्हणजे मला उद्या पुन्हा एवढ्या लांब हेलपाटा नको. काय चालेल ना ? "

" हो. "

श्रीकाकाने गाडी वळवून आडव्या गल्लीत घेतली आणि एका मोठ्या बंगल्याच्या पिछाडीला उभी केली. बंगल्याच्या मागच्या बाजूलाही बंगल्याचे नाव लिहिले होते.

' ललना. '

" काका, हे कसलं नाव ? "

" अरे, मुलगी, आई आणि बाप प्रत्येकाच्या नावाचं आद्याक्षर घेऊन तयार केलं आहे. ही आहे बंगल्याची मागची बाजू. पुढच्या बाजूला नो पार्किंग आहे आज म्हणून इथं उभी केली आहे. तुम्ही इथंच बसा. मी आलोच आत्ता दहा-पंधरा मिनिटांत." असे सांगून श्रीकाका गल्लीच्या पुढच्या तोंडाशी गेला.

" बरं," असे अजय-नली म्हणाली खरं, पण थोड्याच वेळात मोटारीत जाम उकडायला लागले.

" नले, चल जरा कोपऱ्यावर जाऊन येऊ झटकन्. काय झकास रोषणाई केलेली दिसतेय बघ. माडाचं झाड खालपासून वरपर्यंत दिव्यांनी लगडलंय. दारावर चक्र फिरतंय. चल, श्रीकाका काही दहा मिनिटांत येत नाही. आपण जाऊन येऊ. इथं उकाड्यात बसण्यापेक्षा—"

नलीला खरं म्हणजे कंटाळा आला होता. पण नाही म्हटले तर अज्या एकटाच जाईल आणि काळोखात आपल्याला एकटेच बसावे लागेल म्हणून ती पण खाली उतरली आणि म्हणाली,

" चल. "

दोघेही कोपऱ्यावर धावत गेले. कुणाच्यातरी लग्नाचा स्वागत समारंभ होता. खूपच झगझगाट केला होता. दिव्यांची चक्रे फिरत होती. त्यांतून निरनिराळ्या आकृत्या तयार होत होत्या. झाडांतून काजवे लुकलुकावेत तसे दिवे चमकत होते.

दहा-पंधरा मिनिटे झाली आणि अजयला एकदम आठवण झाली— " काका, आला असेल तर—"

इतक्यात बाजूच्या रस्त्याने गलका ऐकू आला. पाठोपाठ माणसे धावत आलेली दिसली. कोपऱ्यावरच्या चांभाराने घाईघाईने आपले सामान आवरीत म्हटले, " ए पोरांनो, पळा घरला. मारामारी झालेली

दिसतीया. मेहमूद दारू पियाला असंल. गर्दीत चेंगराल. त्यो चिडला म्हंजी दगुड बी घालील डोकशात दिसंल त्येच्या. पळा बिगीनं!"

एरवी, मारामारी बघायला अजयला आवडले असते. पण आज नली बरोबर होती. शिवाय काकाही आला असेल. अजय नलीचा हात धरून धावतच परत गल्लीत शिरला आणि गाडीचे दार उघडून आत बसला. खैर, अजून काका आला नव्हता!

आता काळोख अगदी गडद झाला होता. त्या गडद काळोखात आणखी एक गाडी गल्लीत येऊन उभी राहिली होती आणि आपण तीतच चढलो आहोत हे दोघांच्याही लक्षात आले नाही. ती गाडी रंगाने, आकाराने अगदी श्रीकाकाच्या गाडीसारखीच होती. त्यामुळे त्यांना वाटले— आपण श्रीकाकाच्याच गाडीत बसलो आहोत.

गाडीत बसल्या बसल्या अंगाचे मुटकुळे करून नली मागच्या सीट-वर झोपून गेली. अजयलाही जांभया यायला लागल्या. तोही पाय तणावून आडवा रेलला. 'श्रीकाका केव्हा येतो, कुणास ठाऊक' असे मनाशी म्हणत अजय येणारी झापड आवरू लागला. तरीही जड झालेले डोळे मिटलेच. अर्धवट जागृती, अर्धवट झोप अशा अवस्थेत असतानाच बाहेरच्या रस्त्यावर कुणाचे तरी बूट वाजले आणि मोटारचे पुढचे दार खाडकन् उघडले.

"चला, श्रीकाका आला वाटतं, आता एकदम घर की अंथरूण—" मिटलेल्या डोळ्यांनीच अजयने मनात म्हटले आणि नलीशेजारी तोही अवघडून आडवा झाला.

मोटारचे दार बंद होऊन मोटार चालू झाली. गल्लीतून बाहेर पड-ताच तिने वेग घेतला. वाऱ्याची गार झुळूक घामाच्या अंगावर सुखद वाटत होती. झोप डोळ्यावर चढायला लागली.

श्रीकाकाने काही प्रश्न विचारला असे अजयला वाटले, पण काकाचा

आवाज एकदम इतका बसला कसा ? आत उठून बसलंच पाहिजे त्याशिवाय ही अनावर झोप कमी होणार नाही. वाटेत गारमेंट क्लीनर्स-पाशी उतरून कपडे घ्यायचे आहेत. उद्या दुकान बंद. काकाला गाडी थांबवायला सांगायला हवं. खिशातली पावतीची चिठ्ठी चाचपत अजय मोठ्या मुष्किलीनं उठून बसणार तोच त्याच्या कानावर छोट्या मुलाच्या रडण्याचा आवाज आला.

अरे, काकानं गाडीत लहान मूल कुणाचं घेतलं आहे ? --आता अजयने पुरते डोळे उघडून पाहिले, तर त्याला मोटारच्या पुढच्या भागात दोन इसम बसलेले दिसले आणि दोघांच्यामधे ते लहान मूल असावं. ते अजयला दिसत नव्हतं, पण हळूहळू त्या मुलाच्या रडण्याचा आवाज वाढत होता. काकाच्या शेजारी बसलेला माणूस त्या मुलाला समजाव-ण्याचा प्रयत्न करीत होता, पण मूल ऐकत नव्हते.

रस्त्यावरच्या दिव्याचा उजेड पडला आणि अजयच्या एकदम लक्षात आले की पुढे गाडी चालवीत असलेला माणूस मुळी श्रीकाका नव्हताच. लक्षात आले आणि श्रीकाकाला प्रश्न विचारण्यासाठी उघड-लेले तोंड त्याने गपकन् मिटून घेतले. श्रीकाका बारीक होता तर या माणसाची गर्दन चांगलीच रुंद दिसत होती आणि मुख्य म्हणजे त्याच्या डोक्यावर तुळतुळीत टक्कल होतं. श्रीकाकाचे केस किती कुरळे आणि छान होते !

दोघांचेही चेहरे दिसत नव्हते पण त्या दुसऱ्या माणसाने ते मूल उचलून खांद्यावर टाकले आणि तो त्याला थोपटू लागला तेव्हा ते हात फार केसाळ आहेत असे अजयच्या लक्षात आले. तसेच त्या माणसाच्या डोक्यावर दाट केस होते पण पाठीमागे एक रुपयाएवढ्या जागेवर मात्र मुळीच केस नव्हते. तिथे काहीतरी जखम झालेली दिसत होती, आणि त्याचे कान पसरट होते. गाडी वेगात होती. दोन्ही माणसे ओळखीची

नव्हती.

म्हणजे आपण दुसऱ्या कुणाच्या मोटारीत तर जाऊन बसलो नाही ? पण छे, शेजारी नली आहे तेव्हा ही गाडी काकाचीच आहे. पण मग हे लोक कोण ? कुठं जाताहेत ?

अजयच्या डोक्यात विचार घोळत होते आणि इकडे त्या मुलाने रडण्याचा सूर वाढवला होता. तो दुसरा माणूस त्याला खांद्यावर टाकून थोपटण्याचा प्रयत्न करीत होता, पण अंग टाकून ते मूल आणखीनच किंचाळून रडायला लागले. त्याबरोबर ड्रायव्हिंग करणाऱ्या त्या माणसाने एक शिवी हासडली.

हळूहळू अजयच्या डोक्यात चक्रे फिरायला लागली. ही माणसं या मुलाशी इतक्या तुसडेपणानं वागताहेत तेव्हा ते काही त्यांचं मूल दिसत नाही. आणि हे लोक श्रीकाकाची गाडी घेऊन कुठे चालले आहेत ?

" चोर— " अजयच्या डोक्यात एकदम ट्यूब पेटली. हे लोक नक्कीच चोर असले पाहिजेत आणि हे मूल— हेही त्यांनी चोरलेलंच असलं पाहिजे. ही....ही गौरी तर नसेल ? पण आता हे लोक कुठं चालले आहेत ? म्हणजे हे गाडीपण पळवून नेत आहेत ?— अजूनही आपण बसलेली गाडी श्रीकाकाचीच आहे असं अजयला वाटत होतं.



—टोळी…मुलं पळवणारी टोळी तर नव्हे.

एक क्षणभर भीतीचीं लाट अजयच्या मनात थरथरली. नलीला गाढ झोप लागली आहे म्हणून बरं. नाहीतर एव्हाना रडून ओरडून गोंधळ घातला असतान् आणि आपण मागे आहोत हेच मुळी अजून या दोघांच्या लक्षात आलेलं नाही. समजा त्यांतल्या एकानं मागे वळून पाहिलं तर–

बापरे, अजय पटकन् गाडीची मागची सीट आणि पुढची सीट यांच्या मधल्या जागेत अंग चोरून बसला. तिथंच त्याच्या पायाला काहीतरी टोचले. अजयने ते उचलून खिशात घातले आणि त्याने नलीलाही खाली ओढून घेतली. झोपेत असलेल्या नलीला काहीच कळले नाही.

दरम्यान गाडीत असलेले ते मूल किंचाळून किंचाळून रडतच होते. ते दोघेही त्रासले होते. अवाच्य भाषेत शिव्या घालीत होते. घोगऱ्या आवाजातला तो ड्रायव्हर तर संतापलाच. म्हणाला, " दे बघू फेकून गाडीतनं बाहेर. सालीनं आणल्यापासून नुसता वैताग आणला आहे. जीव खातेय— "

" एकदा डी. वाय. एस्. च्या स्वाधीन केली की सुटलो. "

" पण या वेळी आपलं टोकन मान्य केल्याशिवाय नाही द्यायची. साली काय गोड पोरगी आहे रे ? "

" हं– असेल गोड, पण आत्ता तर नाकात दम आणलाय ना ? त्याचीही भरपाई झालीच पाहिजे. तू डी. वाय. एस्. ला याझदानमधे भेटायला सांग. "

मुलीचे किंचाळून रडणे वाढतच होते. रडता रडता तिने पुढच्या सीटवरून मागे आपले हात झोकून दिले. अजयने ते हळूच हातात घेतले. थोडेसे थोपटल्यासारखे केले आणि तिच्या एका हातातल्या बांगड्या हळूच काढून घेतल्या. त्याबरोबरच एक काहीतरी चपटी वस्तू

त्याच्या हातात आली. त्याने ते सगळे खिशात सारले.

—"इथेच थांबव गाडी. आसपास कुणी नाही. त्या पोरटीच्या घशात अफूची गोळी कोंब म्हणजे आवाज गप्प होईल. खाली वाऱ्यावर घेऊ या म्हणजे झोपेल. पुढचा मार्ग तरी सुकर होईल." केसाळ इसम म्हणाला.

जाडगेल्या इसमाला ते पटले. त्याने हळूहळू गाडीचा वेग कमी केला. गाडी थांबवून दार उघडून ते दोघेही बाहेर पडले. अंधारात दिसेनासे झाले.

त्यांच्या पावलांचा आवाज दूरवर जाताच अजयने हळूच डोके वर उचलले. गाडीत कुणीच नव्हते. मग त्याने मागचे दार उघडले आणि तोही खाली उतरला. माडांच्या सावलीत अंधारातच गाडी उभी होती. पण थोड्याच अंतरावरून समुद्राच्या लाटांचा आवाज कानावर येत होता आणि दूरवर दिवे लुकलुकताना दिसत होते.

समुद्रकिनारा जवळच आहे हे अजयने ओळखले. पण कुठला?— कुठला का असेना, पण ती मंडळी परत यायच्या आत आपण इथून दूर जायला हवं, नलीला घेऊन. नलीची आठवण होताच अजय परत गाडीकडे वळला. ही गाडी श्रीकाकाची नाही हे आता त्याच्या लक्षात आले. त्याने मागे जाऊन, नंबर बघून खात्री करून घेतली. नलीला हलवून जागे करीत म्हणाला,

"नले, ऊठ लवकर. बाहेर पड !"

"अज्या, त्रास देऊ नकोस हं. मारीन."

"गधडे, कसला प्रसंग आला आहे! खाली उतर आधी. तिला घुसळून हाताला धरून अजयने बाहेर ओढलीच आणि बाहेर येऊन नली डोळे चोळीत उभी असतानाच त्याने तिला हाताला धरून पळायला सुरुवात केली.

मात्र पळण्यापूर्वी दोन गोष्टी करायला तो विसरला नाही.

ती माणसे गेली त्याच्या विरुद्ध दिशेला उजेड दिसत होता तिकडे तो धावत सुटला. दिव्यांच्या उजेडात आणि माणसांच्या गर्दीत आल्यावर त्याच्या लक्षात आले की हा जुहूचा किनारा आहे. भेळवाल्यांची झगमगती दुकाने आणि शहाळ्यांची रास, कुल्पीचे माठ पाहिले तेव्हा कुठे त्याच्या जिवात जीव आला.

तो वाळूत बसला.

" काय झालं रे अज्या ? इथे कसे आलो आपण ? तू मला येवढं धावत का आणलंस ? परकरात पाय अडकून फाटला ना माझा परकर– श्रीकाका कुठंय ? " नलीने प्रश्नांची सरबत्ती वाळूत बसलेल्या अजयवर केली.

अजयने ओढून तिलाही खाली बसवले आणि एका दमात सगळे सांगितले.

" आई ऽ ग, म्हणजे आपण दुसऱ्याच्याच मोटारमधे बसलो होतो ? आणि ते लोक चोर होते ? ई ऽऽ अज्या, तुझ्या धीटपणाची मात्र कमाल आहे हं. " नलीला प्रथमच आपल्या भावाचा जबर अभिमान वाटला, " ए, पण आता काय करायचं रे ? आपण घरी कसं जायचं ? आणि श्रीकाका आपल्याला शोधत बसेल तो ! "

" थांब जरा ! मला विचार करू दे एकंदर सगळ्या परिस्थितीचा. " मृत्युंजयच्या स्टाइलने बसून अजयने आपले डोके विचारात खुपसले. थोड्या वेळाने म्हणाला, " आपण आता इथनं आधी श्रीकाकाला फोन करूया–की आम्ही घरी पोचलो म्हणून. "

" अरे, पण आपण घरी कुठे आहोत ? "

" ऐक ग, मधे मधे बोलू नको. अजून श्रीकाका त्या पार्डीकरांच्या घरीच असेल तर देवच पावला. मग काहीच गोंधळ होणार नाही. जर

तो आधी निघाला असेल तर—" असे म्हणत अजय उठलाच. जुहू हॉटेलमधे शिरून त्याने डिरेक्टरीत इंजिनीयर पार्डीकरांचा फोन नंबर शोधून काढला आणि फिरवला.

"हॅलो, श्रीकाका आहे?"

"कोण?" पलीकडून दुसऱ्याच कुणाचा तरी आवाज आला. अजयच्या एकदम लक्षात आलं—श्रीकाकाचं सबंध नाव सांगायला हवं. त्याने घाईने ते सांगितले.

"हो, ते समोरच्या बागेत गेले आहेत. त्यांच्या पुतण्यांना शोधायला."

"मी त्यांचा पुतण्या अजयच बोलतो आहे. त्यांना म्हणावं, मित्राची गाडी मिळाली म्हणून आम्ही सरळ घरी आलो. तिथे लग्नाला आला होता तो. नलीला फार झोप येत होती म्हणून आलो म्हणावं. मित्र इथलाच आहे बिल्डिंगमधला."

"बरं बरं, सांगतो."

अजयने फोन खाली ठेवला. चला, सुटलो. आपण कुठे आहोत हे सांगितलं असतं तर श्रीकाका इथं आला असता हे खरं, पण मग आपण इथं कसे आलो हे त्याला सांगावं लागलं असतं. उगीचच गोंधळ आणि वर तुफान बोलणी खावी लागली असती. —दुसऱ्याच्या गाडीत बसलातच कसे, एवढी अक्कल नाही का?—आणि गाडी घेऊन आलेले लोक चोर आहेत असं पक्कं वाटतंय आपल्याला, पण ते सिद्ध कसं करणार? आपल्यावर विश्वास तरी कोण ठेवणार? तेव्हा गप्पं राहावं हेच ठीक. नलीलाही त्याने बजावले,

"नले, यातलं घरात कुणाजवळ बोलशील तर बघ—आता आपण बसनं घरी जाऊ या."

"अरे, पण कुठली बस जाते ते कुठं माहिती आहे? आपण इकडे

कधी बसनं आलोच नाही की."

"मला माहीत आहे ग. आलो नसलो म्हणून काय झालं? आणि तोंड तर दिलं आहे ना देवानं? विचारू कुणाला तरी. ऊठ आता."

सुदैवाने बस लवकर मिळाली आणि दोघेही घरी सुखरूप आले.

पांघरुणात शिरल्याबरोबर नलीला गाढ झोप लागली; पण अजय मात्र गाडीत रडत असलेल्या त्या छोट्या मुलीबद्दल आणि त्या दोघा आडदांड माणसांबद्दल विचार करीत राहिला.

□

## ७. मोहीम

अजबगजब मंडळाची आजची मीटिंग अजयच्याच घरी भरली होती. अगदी राजरोसपणे. नलीदेखील आज त्यात सामील झाली होती. मंडळाच्या सभासदांना काल संध्याकाळी आपल्याला आलेला अनुभव अजय अगदी खुलवून खुलवून सांगत होता. नलिनीही त्याला साथ देत होती आणि भास्कर, बुलुंद, गज्या– सगळे ते ऐकताना थरारून गेले होते.

"अज्या! काय धमाल अनुभव रे?"

"अगदी चित्तथरारक का कायसं म्हणतात–" बुलुंद.

"पण अज्या, खरं म्हणजे तू मोटारीतून उतरायलाच नको होतंस. थेट जायचंस त्यांच्याबरोबर ते जातील तिथं, म्हणजे पत्ता लागला असता." भास्कर म्हणाला.

"माझ्यासुद्धा मनात आलं होतं रे, पण ही नली होती ना बरोबर.

आणि घरी वेळेवर गेलो नसतो तर किती गोंधळ उडाला असता. शिवाय दोस्त, आपलं काय ठरलं आहे की सगळ्यांनी मिळून साहस करायचं."

"हे बाकी बरोबर हं अज्या. खरे जिगर दोस्त आहोत आपण–"

जिगरला काय कळलं कुणास ठाऊक. सगळ्यांच्या मधून हिंडताना त्याने मधेच तोंड वर केले आणि तो भुंकला. जणू त्याला म्हणायचे होते, "अरे, मी पण तुमच्यातलाच." भास्करला त्याचे म्हणणे कळले. जिगरचे तोंड दोन्ही हातांनी उचलून आपल्या गालावर घाशीत भास्कर म्हणाला, "होय रे होय जिगर; तू पण आमचा दोस्त. आता बैस बरं तिथं."

जिगरचे समाधान झाले. भास्करची आज्ञा प्रमाण मानून तो एका कोपऱ्यात दोन पाय पुढे, दोन पाय मागे पसरून बसला.

"बोल अजय, मग आता काय करायचं?" गज्याने विचारले, सगळ्यांनाच उत्सुकता होती.

अजय सरसावून बसला. बुशशर्टची कॉलर ताठ करीत तो म्हणाला. "तर मंडळी आता आपण आपल्या मंडळाच्या कामकाजाला सुरुवात करू या. घडलेली सगळी हकीगत मी तुम्हाला सांगितलीच. काल सकाळी पेपरमधे आलेली ती बातमी मी कापून ठेवली आहे. ती तुम्ही सगळ्यांनी वाचा." असे म्हणून वर्तमानपत्रातले कात्रण अजयने सगळ्यांच्याकडे फिरवले.

"पण अज्या, तीच ती मुलगी असं तू कशावरून म्हणतोस?" भास्करने शंका काढली.

"तसं ठामपणानं मला म्हणता यायचं नाही, कारण त्या मुलीचा चेहरा अंधारात मला दिसला नाही. आणि ती रडत होती त्यामुळे मला बघताही आला नाही. मी फक्त काढून घेतल्या त्या तिच्या दोन बांगड्या आणि– "

" बघू बघू, तेव्हा म्हणाला नाहीस तो काही ?" बांगड्या म्हटल्यावर नलीची उत्सुकता जागी झाली. तिच्यापुढे अजयने बांगड्या टाकल्या. साध्या लाल कचकड्याच्या त्या बांगड्या होत्या.

" फुस ! या तर साध्या बांगड्या ! कुठल्याही दुकानात मिळतात असल्या. रंगसुद्धा विटला आहे बघ." नली म्हणाली.

" याच्यावरून काय कळणार ?"

"—तरीपण त्या दोघांच्या बोलण्यावरून माझा आपला असा कयास आहे की तीच गौरी असावी." बोलता बोलता अजयने खिशातून आणखी एक वस्तू काढली. काळ्या गोफात ओवलेला एक जस्ताचा चपटा ताईत होता तो.

" हे काय ?" गज्याने विचारले.

" हे त्या बांगड्यांच्याबरोबरच माझ्या हातात आलं. बहुधा तिच्या गळ्यातून तुटला असावा."

" हा तर ताईत आहे" बुलुंद म्हणाला. " असले ताईत आमच्या वाडीच्या कोपऱ्यावर रोज विकायला बसतात. दोन आणे चार आणे किंमत असते."

" त्यात मंतरलेला अंगारा असतो म्हणे. म्हणजे भुताखेताची बाधा होत नाही किंवा दृष्ट लागू नये म्हणून अस्वलाचा केस बांधतात. मी काकूंच्याबरोबर बारशाला गेले होते ना तिथं असाच ताईत बांधला—" नलीने माहिती पुरवली.

" म्हणजे याचाही उपयोग केराच्या डब्यात टाकण्यापुरताच" भास्कर म्हणाला.

त्याच वेळी बुलुंद तो ताईत उघडण्याची खटपट करीत होता. त्याला यश आले आणि ती डबी उघडली. त्याबरोबर आतून एक बारीकशी कागदाची सुरळी बाहेर पडली. अजयने ती उघडून पाहिली आणि

तो ओरडलाच,

" अरे, हे पाहा– थांबा हं. " तो धावतच आत गेला आणि आतून दुर्बिण घेऊन आला. मग तो कागद दुर्बिणीतून पाहून तो म्हणाला,

" मंडळी हा घ्या पुरावा. ती गौरी होती हे नक्कीच. हा फोटो बघा. छोटा आहे आणि तसा पुसट आहे, तेव्हा नुसता दिसणार नाही. या दुर्बिणीतून बघा आणि तो पेपरमधे आलेला फोटो बघा. आहे का नाही दोन्हीमधे साम्य ? ती नक्कीच गौरी. "

सगळ्यांनीच तो ताईतात ठेवलेला फोटो पाहिला. पण तो आणि पेपरमधला फोटो दोन्ही अस्पष्टच होते. साम्य वाटत होते, पण शंभर टक्के खात्री पटत नव्हती. लहान मुलांचे चेहरे पुष्कळ सारखे दिसतात.

" समजा–ती गौरी असली तरी आता काय उपयोग ? त्या गाडीतच बसून तू त्यांचा पाठलाग केला असतास तर तिचा ठावठिकाणा समजला असता. गाडीचा नंबर तरी माहिती आहे का ? " भास्कर म्हणाला.

" हो, हा बघ मी टिपून ठेवला आहे. " पाकिटातून एक चिठ्ठी बाहेर काढीत अजय म्हणाला. गाडीचा नंबर आहे, M. R. H. 3638."

" या नंबरावरून जर गाडीचा मालक आपण शोधू शकलो तर त्या मुलीचा पत्ता लागेल. " गज्या म्हणाला.

" पण या अफाट शहरात नुसत्या नंबरावरून कसा पत्ता लागायचा?"

" पेट्रोलपंपावरचा इसाबर आपला दोस्त आहे. त्याला विचारू. " बुलुंद म्हणाला.

" ए हे रे ! आपल्या मुंबईत काय एकच पेट्रोल पंप आहे ? शंभर पेट्रोलपंपांवरून हजारो मोटारी रोज येत-जात असतात–" नलीने शंका काढली.

" तर काय ? वल्या म्हणजे अगदी— "

" मंडळी, आणखी एक धागा सापडला आहे– " गारुड्याच्या

पोतडीतून एकेक वस्तू काढाव्यात तसा अजय एकेक पुरावा बाहेर काढीत होता. " हा शेवटचा पुरावा " खिशातून एक किल्ल्यांचा जुडगा काढून तो हातातल्या हातात चाळवीत अजय म्हणाला.

" काय आहे रे ? "

" या किल्ल्या पाहिल्यात ? मागच्या सीटच्या मधल्या जागेत मी बसलो तेव्हा माझ्या पायाला टोचल्या आणि मी त्या उचलून खिशात घातल्या. "

" पाहू, पाहू " भास्करने त्याच्या हातातून किल्ल्या काढून घेतल्या आणि तो त्या निरखून पाहू लागला. एक पितळी किल्ली होती आणि दोन लांब लोखंडी किल्ल्या होत्या. याशिवाय आणखी एक प्लेटिंग केलेली बारीकशी चपटी पट्टी होती. तिला दोन्ही बाजूंना गोल भोके पाडलेली होती. एकात किल्ल्यांची गोल रिंग अडकवलेली होती. दुसऱ्या बाजूला बहुधा साखळी असावी. ती पट्टी हातात घेऊन भास्कर निरखून पाहू लागला.

" या किल्ल्यांचा काय उपयोग ? अशा कितीतरी किल्ल्या असतील. काय पत्ता लागणार ? " निराश होऊन गज्या म्हणाला.

" लागेल. का नाही लागणार ? दोस्त, बघा या किल्ल्यांवरूनच पत्ता लागेल " भास्कर ओरडला.

" तो कसा ? " बुलुंदने विचारले.

" अज्या, तू अगदी झकास पुरावा आणलास गड्या. " किल्ल्यांच्या जुडग्यातली ती छोटीशी पट्टी हातात नाचवीत भास्कर म्हणाला, " ही पट्टी पाहिलीत ? हिच्यावर नाव लिहिलेलं आहे. "

" बघू, बघू, " सगळ्यांनी एकच गिल्ला करीत भास्करच्या हातातल्या किल्ल्या घेण्याचा प्रयत्न केला. त्यांना थोपवीत अजय म्हणाला,

" ऑर्डर, ऑर्डर. मंडळी, गडबड बंद ! काम कसं शिस्तीत चाललं

पाहिजे. भास्कर, तूच वाचून दाखव आधी त्यावर काय लिहिलं आहे ते."

"Ravi 450420" भास्करने वाचले.

"म्हणजे आला का पुन्हा घोळ? नुसतं Ravi वरून कसं काय समजणार आणि हा नंबर कसला?"

"अरे जरा डोकी चालवा की! का नुसतेच कांदेबटाटे भरले आहेत." अजय म्हणाला.

"मला वाटतं अज्या, ४५०४२० हा टेलिफोन नंबर असावा." नली म्हणाली.

"वा, बरंच डोकं आहे की लिंबूटिंबूला" गज्या अजयच्या कानात कुजबुजला.

"काय कुचकुचताय रे, अज्या, टिंगल करणार असलास तर बघ हं? मी—" नली चिडली.

"अग, टिंगल कशाला करू? तुझी कल्पना अगदी बरोबर आहे असंच तो म्हणत होता" अजय म्हणाला. "गज्या, ती टेलिफोन डिरेक्टरी आण. पंचेचाळीस म्हणजे कोणता भाग आला रे?"

"दादर–माहीम." भास्कर म्हणाला.

"हं, ही घे. पण यात नंबर कसा शोधणार? आख्खी डिरेक्टरी पालथी घालायला हवी."

"कशाला?—हे बघा R आणि I ही दोन अक्षरं आहेत ना, पहिली आणि शेवटची. म्हणजे त्याचं आडनाव R नं तरी सुरू होत असेल, नाहीतर I नं तरी. त्या दोन अक्षरांखाली येणारी सगळी नावं शोधूया. त्यांतही ४५ आकड्यांनी सुरू होणारे नंबर बघा म्हणजे झालं. भास्कर, एक पान तू आणि गज्या, एक पान तू असे दोघं एकदम बघा म्हजजे लवकर काम होईल. नले, तोवर तू बरणीतून बिस्किटं, खारे

काजू, शंकरपाळे घेऊन ये."

अजयने भराभरा हुकूम सोडले. नली उठून आत गेली. बुलुंद उठून जिगरबरोबर खेळू लागला आणि गज्या व भास्कर डिरेक्टरीत डोकी खुपसून बसले.

थोड्याच वेळात नलीने बश्या भरून बाहेर आणल्या. तोपर्यंत गज्या-भास्करची R आणि I अक्षरे बघून झाली, पण R आणि I दोन्हींच्या-पुढे ४५०४२० हा नंबर काही त्यांना दिसला नाही.

"साला पक्का चारसोबीस दिसतोय रे. यात कुठेच सापडत नाही." गज्या वैतागून म्हणाला.

"नक्की नाही ना? नीट पाहिलंत?"

"तर रे! दोन अधिक दोन चार अधिक भास्करचे चष्म्याचे दोन म्हणजे सहा डोळ्यांनी पाहिलं की."

हातातल्या किल्लीची ती चपटी पट्टी अजयने पुन्हा न्याहाळली. "अरे, हे शेवटचं अक्षर आय आहे का नुसतीच उभी रेघ आहे? काही कळत नाही. पुसट झाली आहे. आण बघू इकडे डिरेक्टरी! तुम्ही खायला सुरुवात करा तोवर मी व्हीमधे पाहतो. व्हीची यादी काही फार मोठी असणार नाही." अजयने डिरेक्टरी हातात घेतली आणि 'V'मधे पंचेचाळीस आकडा बघायला सुरुवात केली.



" अरे, सापडला ! " थोड्याच वेळात तो ओरडला. खाऱ्या काजूचा बोकाणा भरीत 'कुठे-कुठे' म्हणत गज्या व भास्करनीही डिरेक्टरीत डोकी खुपसली.

" हे बघ इथे— वरवडकर आर. ए. ४५०४२०— केसरिया रोड, मुंबई १६. "

" मुंबई सोळा म्हणजे माहीम ना रे ? "

" हो. "

" मग माहीम पोस्टात गेलो की आपल्याला तो केसरिया रोड सापडेल. वल्या, तू हा पत्ता आणि हे घर शोधून येऊन आम्हाला सांगायचंस. "

" कबूल. उद्या सकाळीच पत्ता काढून आणतो. "

" ठीक, मग बुलुंदने पत्ता आणला की आपण तिकडे जाऊ आणि त्या माणसाची गाठ घेऊ. "

" गाठ घेऊन काय करणार ? "

" ते पुढे पाहू. शक्य तितक्या लवकर आपल्याला गौरीची सुटका केली पाहिजे. तेव्हा मंडळी, उद्या सकाळी जेवून हातावर पाणी पडलं की इथे यायचं. मग आपली मीटिंग पुढे चालू. तोवर—"

" राम राम, मंडळी ! राम राम—" गज्याने गावकरी फडातल्या कार्यकर्त्यासारखा आवाज काढीत म्हटले.

आणि मुले पांगली.

बुलुंदने आपली कामगिरी बरोबर बजावली. वरवडकर आर. ए. चा पत्ता त्याने बरोबर काढून आणला. ते घरही तो दुरून पाहून आला होता.

" आता आपण सगळ्यांनी तिथे जायचं. नले, तू मात्र इथंच राहा. मधूकाका आज इकडं येईल. त्याला थोपवायचं काम तू करायचंस. मी कुठे गेलोय त्याचा पत्ता लागू देऊ नकोस. नाहीतर बडबडशील—"

" नाही रे ! तुझी शप्पथ. " नलीने गळ्याला हात लावून म्हटले.

चौघेही मित्र माहीमला केसरिया मार्गावर येऊन हजर झाले. बुलुंद सगळ्यांचा म्होरक्या. त्या मार्गावरच्या आडव्या गल्लीत शिरल्यावर त्याने दुरूनच एक बैठे घर दाखवले. घराचा रंग पार धुऊन गेला होता. कुठे कुठे गिलावासुद्धा पडला होता. घराभोवती थोडे आवार होते. त्यात २।३ नारळीची झाडे होती. घरासमोर जुने पोर्च होते. त्या पोर्चमध्येच एक गाडी उभी होती. बाहेरच्या फाटकावर पाटी लटकत होती, ' बरबडकर, आर. ए. '

दबकत दबकत सगळेच फाटकापाशी आले. थोडा वेळ तिथेच उभे राहून विचार करू लागले.

" इथवर तर आलो. आता काय करायचं ? " बंगल्यावरून नजर फिरवीत गज्या म्हणाला, " अगदीच बेकार घर आहे की रे ! "

" अरे, अशाच घरात या लोकांचे अड्डे असतात. वरून संभावीत दिसतात, मग पोलिसांचं लक्ष जात नाही इकडे ! " इति बुलुंद.

" अज्या, गाडी तीच आहे का रे ? "

" वाटते आहे तीच. बघ ना तसाच रंग, तोच आकार." आपला एक अंदाज बरोबर ठरलेला पाहून सगळ्यांच्याच अंगावर आनंदाचे शहारे आले.

" नंबरप्लेट बघून खात्री करून घे आत जाऊन. " भास्कर म्हणाला. " तू आणि गजा आत जा. आम्ही दोघं बाहेरच ह्या कुंपणाआड लपतो. काही धोका वाटला तर खुणेची शीळ घाल. "

" येस् !—अज्या, मी त्या दोघांनाही लोळवीन. तू खूण कर की अशी

उडी घेईन—" बुलंद अवसानात म्हणाला.

"त्या टक्कलवाल्याला फक्त तूच ओळखू शकशील. ती पोरगी असेल का रे आत?— तिचा फोटो आणायला हवा होता रे."

ते बोलत होते तेवढ्यातच बंगल्याचे पुढचे दार उघडल्याचा करकर आवाज आला. सगळे एकदम सावध झाले. भास्कर आणि बुलंद चटकन् कुंपणाआड दडले आणि अजय व गज्या पटकन् आत शिरून पोर्चच्या खांबाच्या जाड उभे राहिले. तेवढ्यात अजयने मोटारचा नंबर पाहिला. तो तोच होता.

इतक्यात पुढचे दार पूर्ण उघडून आतून एक व्यक्ती बाहेर आली. अजयने त्याच्याकडे निरखून पाहिले गज्याने हळूच उत्सुकतेने विचारले,

"तोच का रे?"

पण अजयची निराशा झाली. बाहेर आलेला माणूस अंगाने किरकोळ, वयाने साठीच्या पुढचा होता. त्याच्या डोक्यावर केस होते आणि ते सगळे पांढरे झाले होते. त्याची दृष्टी मात्र या वयातही चांगली असावी. कारण खांबाआड दडलेल्या अजयला त्याने बरोबर हेरले आणि विचारले,

"कोण आहे रे?"

आता अजय, गज्याला समोर येणे भागच होते. अजयने पटकन् मनात विचार केला आणि पुढे येऊन तो म्हणाला,

"वरवडकर इथंच राहतात ना?"

"हो, कोण हवंय तुम्हाला? मनोहर?"

"अं? एम....नाही आर. ए. हवेत."

"मीच तो. बोला कसली वर्गणी गोळा करायला आला आहात? सध्या वर्गण्या, फंड गोळा करायला येणाऱ्यांचं पीकच आलं आहे. त्यांना नाही दुष्काळ. जो येतो तो मदत मागतो. प्रत्येकजण एकदाच येतो, नवीनच आहे म्हणतो. पण लेकांनो, देणारे आम्ही तेच आहोत ना?

आता आम्हांला दिवाळं काढायची वेळ आली आहे." म्हाताऱ्याचा आवाज चढला.

हे तर कुठच्या कुठेच चाललं! गज्याने अज्याला चिमटा काढला. अजयने खिशातून किल्ल्यांचा जुडगा काढीत विचारले,

"आजोबा, आम्ही काही मदत मागायला नाही आलो. पण— ही वस्तू तुमची आहे?"

"बघू" म्हणून त्यांनी किल्ल्या हातात घेतल्या, "अरे, ह्या तर माझ्याच किल्ल्या! कुठं सापडल्या तुम्हांला? बरं झालं बाबा. गेले दोन-चार दिवस शोधतोय. जानकी, अग जानकी— ह्या बघ किल्ल्या सापडल्या! अग, बाहेर ये—"

पन्नाशीच्या पुढची एक हसतमुख बाई आतून पदराला हात पुशीत बाहेर आली. ही त्यांची बायको आहे हे मुलांनी ओळखलेच.

"बघा, आणि तुम्ही धरून बसला होतात गाडीतच सांडल्या म्हणून. इथेच आवारात पडल्या असतील. आठवण राहात नाही आताशी तुम्हांला मुळीच."

"कुठे सापडल्या रे?" आजोबांनी विचारले. त्यावर त्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करीत अजयने गाडीकडे पाहात विचारले,

"आजोबा, ही गाडी तुमची?"

"माझी नाही बाबा! माझ्या पुतण्याची, मनोहरची. त्या दिवशी त्याच्या गाडीतून बाहेर गेलो. येताना गाडीचं काहीतरी बिघडलं म्हणून गाडी तिथल्याच गॅरेजमध्ये दुरुस्तीला टाकली आणि मनोहरनं मला टॅक्सीनं पोचवलं. त्या गडबडीत गाडीत विसरल्या असं मला वाटत होतं."

"गाडी कधी मिळाली?"

"अरे, गाडी मिळाली हे नशीब. गॅरेजमधून चोरीला गेली होती.

आजच सकाळी पोलिसांनी शोधून दिली. कुठे जुहूच्या रस्त्याला टाकली होती. आजकाल काय दिवस आले आहेत-- " प्रश्नाचे उत्तर आजीबाईंनी दिले. बऱ्याच बोलघेवड्या दिसत होत्या.

" पण किल्ल्या कुठं मिळाल्या ? " आजोबांनी पुन्हा विचारले.

" किल्ल्या नं ? इथंच कुंपणापाशी सापडल्या. "

हे बोलणे होत आहे तोच आतून लुंगी गुंडाळलेला गुरूशर्ट घातलेला एक तरुण दारात येऊन उभा राहिला. याही माणसाचे अजयने गाडीत पाहिलेल्या माणसाशी कुठलेच साम्य नव्हते. त्याने गज्याकडे पाहून नकारात्मक मान हलवली. ' चल तर मग. ' अशा अर्थाची गज्याने खूण केली.

त्या आलेल्या तरुणाकडे वळून आजोबा म्हणाले,

" मनोहर, अरे किल्ल्या पण सापडल्या माझ्या ! "

" बरं झालं बाई ! आपले योग बरे होते म्हणायचे. "

" आजोबा, आम्ही निघतो " गज्या म्हणाला.

" थांबा, पेढा खाऊन तोंड गोड करून जा. आज गाडी सापडली म्हणून सकाळीच आणले आहेत. मनोहर, ती जेवणाच्या टेबलावरची पेढ्यांची पेटी आण रे. " आजीबाई म्हणाल्या.

मनोहरने पेटी आणली. बाईंनी एक एक पेढा त्यांच्या हातावर ठेवला.

अजय–गज्या फाटकाच्या बाहेर पडले.

" काय चिक्कू बाई आहे रे ? येवढा डबा भरलेला होता पेढ्यांनी, पण दोन दोन पेढे काही दिले नाहीत " बाहेर पडताच त्यांना येऊन मिळालेल्या भास्करच्या हातावर अर्धा पेढा ठेवीत गज्या म्हणाला.

" काय रे, काम फत्ते ? " अजयने दिलेला पेढ्याचा तुकडा तोंडात टाकीत बुलुंदनं विचारलं.

"फुस्ऽ दोन्ही पुरावे फुसकेच निघाले !"

"मंडळी, आपली आजची मोहीम काही फारशी यशस्वी झाली नाही, पण गाडी चोरीला गेली होती ही— म्हणजे मला आलेला त्या माणसांचा संशय खरा आहे. पण आता त्या माणसांचा पत्ता कसा काढायचा ? दोस्त, पुन्हा एकदा नीट विचार करायला हवा." अजय म्हणाला.

"तो करायचा तर करूया, पण आधी पोटात कावळे कोकालतायत त्याची काय वाट ? गड्या, इथं कुठं हॉटेल आहे का चांगलं ?" भास्करला खरंच भूक लागली होती. खाणे म्हटल्यावर बुलुंदनेही साथ दिली.

"अरे, हॉटेल काय करायचं ? इथून समुद्र किती जवळ आहे. तिथे भेळ मिळेल की चांगली."

"खरंच गड्या किती दिवसांत पाणीपुरी खाल्ली नाही चांगली. समुद्रावरच जाऊ या."

"जरूर——" सगळ्यांनाच ती कल्पना आवडली.

□

## ८. आता याझदान हॉटेल !

पाणीपुरी खाऊन झाल्यावर भेळेचा पुडा घेऊन सगळ्यांनीच भेळ-वाल्यांच्या गर्दीपासून दूर वाळूत बसकण मारली.

भरतीच्या लाटा किनाऱ्यावर धडक देत होत्या. फेसाळणारे पाणी पुढे येत होते, अलगदपणे पसरत होते आणि परत मागे जात होते. उन्हाचा

तडाखा कमी व्हायला लागला.

" बोल अज्या, आता काय ?" भेळेच्याच पानाला हात पुसून पान दूर फेकून देत बुलुंदने विचारले. गज्या वाकूतच डोक्यावर हात देऊन आडवा झाला.

" आता सरळ घरी जाणे !" भास्कर म्हणाला.

" येवढ्यात ?"

" मग काय, उगीच नुसती पायपीट--" मघाशी चालताना ठेच लागल्यामुळे दुखावलेला आपला अंगठा कुरवाळीत भास्कर म्हणाला, " यापेक्षा एक मस्त पिक्चर टाकलं असतं तर– आयलंडला काय मस्त पिक्चर लागलं आहे युद्धाचं– आज खरं म्हणजे मला आमच्या मामानं बोलावलं होतं."

" भास्कर, तुला कंटाळा आला असेल तर तू कटू शकतोस" अजय जरा रागानेच म्हणाला.

" तसं नव्हे रे" अजय आपल्याला खरंच काढून टाकतो की काय अशी भास्करला भीती वाटली. त्यामुळे एकदम सूर बदलून नरमाईने तो म्हणाला, " मला तुमच्याबरोबर राहायचंच आहे, पण आता कसा शोध लावणार आपण ? कुठेच काही धागा सापडत नाही–"

" लागेल. मला जरा विचार करू द्या." अजय मृत्युंजयच्या स्टाइल-मध्ये बसत म्हणाला.

" तोवर तिकडे ती माणसं का जमा झाली आहेत ते पाहून येऊ का ?" बुलुंदने विचारले.

" जा."

" भास्कर, येतोस ?"

" चल !" भास्कर लंगडत निघाला.

आता समुद्रावर गर्दी झाली होती. भास्कर आणि बुलुंद त्या माणसांच्या

घोळक्यात शिरले.

वाळूत एका माणसाने स्वतःला पुरून घेतले होते. फक्त दोन हात तेवढे वर दिसत होते. ते जोडलेले होते. बाकी सगळे शरीर– तोंडसुद्धा वाळूखाली गाडले गेले होते. जोडलेले हात हलवून तो नमस्कार करीत होता. बाजूला पसरलेल्या फडक्यावर लोकांनी टाकलेले पैसे पडले होते. गर्दीत कुणीतरी नेमका भास्करच्या दुखऱ्या आंगठ्यावर पाय दिला.

" ह्यः, हे नेहमीचंच. मला वाटलं कुणी बुडालंबिडालं आहे की काय?" बुलुंद म्हणाला, " साले, पैसा मिळवण्यासाठी काय काय करतील– चल, काय झालं रे ? "

" कुणी तरी पाय दिला रे. काय सॉलिड कळ आलीय ! " भास्कर अंगठा दाबत म्हणाला.

" थांब जरा, मी रुमाल बांधतो त्याला म्हणजे पुन्हा धक्का लागायचा नाही. " असे म्हणून बुलुंदने खिशातला रुमाल काढून फाडला आणि त्याची पट्टी करून भास्करच्या पायाला बांधली.

" अरे, रुमाल काय फाडलास ? "

" जाऊ दे रे ! मित्रापेक्षा रुमाल जास्ती आहे काय ? बाहेर कोपऱ्यावर घेता येईल दुसरा. तू चल. "

दोघेही तसेच पुढे निघाले. कुठे मुले वाळूत किल्ले करत होती, कुठे पुढे येणाऱ्या लाटेच्या पाण्यात पाय बुडवून खेळत होती. एक माणूस पाण्यात दूरवर मोठा चेंडू फेकीत होता आणि त्याचा कुत्रा धावत जाऊन पोहून तो आणत होता. ते पाहून भास्कर म्हणाला,

" जिगरला आणायला हवं होतं रे ! त्याला खूप आवडतं असं खेळायला. "

दोघेही लांबवर चक्कर टाकून परत आले.

अजय अजूनही विचारात बुडाला होता. त्याला खरं म्हणजे काही

सुचत नव्हते. विचार करून कंटाळा आला. गज्याला तर चक्क झोप लागली होती.

" अहो कुंभकर्ण ! उठा आता. कुठेही वरी झोप येते बाबा तुला " भास्करने गज्याला हलवले.

" काय अज्या, काही सुचलं का ? " बुलुंदने विचारले.

अजयने नकारार्थी मान हलवली.

" चल तर मग. परतू या आता. अंधार पडायला आला. "

" चला. "

अजय नाइलाजाने उठला. आत्तापर्यंत सगळे कसे भराभर सुचत गेले आणि आत्ताच हे असे डोक्याचे खोके का झाले या विचाराने तो चिडल्यासारखा झाला. काहीच धागा सापडला नाही तर हे साहस अर्ध-वटच सोडून द्यावे लागणार. आणि मग गौरी—

सगळ्यांनी उठून कपडे झटकले आणि वाळूतून चालायला सुरुवात केली, तसा अजयही निघाला. पार्क हॉटेलच्या समोरून ते बसस्टॉप-कडे निघाले तोच त्या हॉटेलमधून एक इसम बाहेर पडला. त्याच्या हातात एक छोटी बॅग होती. अजय, गज्या, भास्कर, बुलुंद यांना ओलां-डून तो माणूस पुढे झाला आणि अजयने एकदम गज्याचा हात दाबला.

" काय रे ? "

" तो बघ. "

" कोण ? "

" हळू. तो समोर चाललाय तो माणूस बघ. त्याचे हात किती केसाळ आहेत आणि डोक्याला मागे बघ— ती गोल जखम.. मी सांगितली तशीच ! "

" अरे हो, आणि त्याचे कान पण किती पसरट आहेत बघ सुपा-सारखे. "

" म्हणजे तोच का ?"

" बहुतेक. त्याचा पाठलाग करू या."

गज्याने हळूच हा संवाद भास्करला सांगितला आणि चौघेही अंतर ठेवून त्याच्या मागोमाग निघाले. चौकात येताच तो माणूस वळून उजव्या हाताला निघाला. तिथे एका दुकानात त्याने काहीतरी घेतले आणि तो बसच्या रांगेत उभा राहिला.

" बल्या, तू याच्यामागोमाग बसने जा, त्याला अगदी चिकटून उभा राहा. सोडू नको" अजयने बजावले.

बुलुंद रांगेत त्याच्याजवळ उभा राहिला. रांग सोडून थोड्या अंतरावर अजय डाव्या बाजूला थांबला आणि गज्या, भास्कर उजव्या हाताला त्या माणसाच्या पाठीमागे उभे राहिले.

बराच वेळ गेला तरी बस मिळण्याचे चिन्ह दिसेना. येणारी बस भरून येत होती. न थांबताच पुढे सटकत होती. एक शिवी हासडून तो माणूस आता येणाऱ्या टॅक्सीला हात करू लागला, पण संध्याकाळची गर्दीची वेळ असल्याने टॅक्सीही रिकामी मिळेना. अखेर एक टॅक्सी त्याने हात केल्यावर थांबली ती नेमकी अजयच्या जवळच. रांग सोडून तो माणूस टॅक्सीजवळ आला, पण दार उघडण्यापूर्वीच टॅक्सीवाल्याने विचारले,

" कहाँ जाना है ?"

" गोरेगाव."

" हम खाली बांद्रातक जायेंगे. ड्यूटी पुरी हुई है." एवढे बोलून टॅक्सीवाल्याने टॅक्सी भुर्रकन पुढे नेली. चरफडत तो माणूस पुन्हा येणाऱ्या टॅक्सीला हात करू लागला. जसजसा वेळ जाऊ लागला तसतसा तो फार बेचैन होऊ लागला. त्याच्या हातातली बॅग बरीच जड असावी. ती तो सारखी या हातातून त्या हातात घेत होता.

अखेर एक म्हातारा टॅक्सीवाला जवळ येऊन थांबला. " कहाँ ? " त्याने विचारले. उत्तर देण्याआधीच तो माणूस दार उघडून आत बसला आणि म्हणाला,

" चलो. "

" लेकिन कहाँ—? "

" गोरेगाव. खंबायत रोड पे याझदान में. "

" ये किधर है. "

" चलो, हम बताते हैं. "

टॅक्सीवाल्याला बहुधा कमी ऐकायला येत असावे. त्यामुळे त्या माणसाला ओरडूनच बोलावे लागले. जवळ असलेल्या अजयला ते सगळे ऐकायला आले. ' याझदान ' हा शब्द ऐकताच त्याने कान आणखी टवकारले. तेवढ्यात टॅक्सी चालू झाली आणि निघून गेली.

टॅक्सी जाताच गज्या–भास्कर अजयच्या जवळ आले. बस आली होती तरी रांग सोडून बुलुंदही त्यांना येऊन मिळाला.

" तोच का रे ? "

" अरे, अगदी नक्की ! "

" कशावरून ? "

" तो ' याझदान 'लाच गेला. टॅक्सीवाल्याला त्यानं सांगितलेला पत्ता ऐकला मी. "

" अरे, मग दुसरी टॅक्सी घेऊन त्याचा पाठलाग नाही का करायचा लगेच ! "

" डिटेक्टिव्ह मृत्युंजय असंच करतो. "

" अजून जायचं का ? "

" पण टॅक्सी मिळायला हवी ना ह्या गर्दीच्या वेळी ? आणि आता अंधार पडला आहे. अंधारात कुठे शोधणार ? आपल्याला त्या बाजूची

काहीच माहिती नाही."

"शिवाय घरी जायलाही उशीर होईल. आज घरी काही सांगितलेलं नाही."

"उगीच बोंबाबोंब होईल."

"हो, तेही खरंच. तेव्हा मंडळी आता आपण घरी परतू या. उद्या पुन्हा पुढचा शोध घेऊ. आता याझदानचा पत्ता आपल्याला मिळाला आहेच, तेव्हा उद्या शोधून काढू. आता घराकडे कूच. अबाउट टर्न! उद्या आजच्यासारखंच हातावर पाणी पडलं की जमायचं आमच्या घरी" अजयने सांगितले.

"बरं–बरं—" करीत सगळे आपापल्या घरी परतले.

दारावरची बेल अजयने वाजवल्यावर हरीने दार उघडले. नली नाचतच पुढे आली. अजयला पुरते आत येऊ न देताच तिने तारेचा लाल कागद त्याच्यापुढे फडकावला.

पण अजयच्या लक्षात आलेच नाही. त्याने विचारले,

"नले, मधूकाका आला होता? त्याला काही सांगितलं नाहीस ना?"

"मधूकाका मुळी आलाच नाही आज. पण अज्या, हे बघ काय–"

"काय?" आत्ता कुठे अजयचे तिच्या हातातल्या लाल कागदाकडे लक्ष गेले. त्याला वाटले ते बिलच आहे.

"कसली खरेदी केलीस? आईनं जाताना पैसे दिले होते ते सगळे उडवले असशील."

"हो, उडवायला मी काय अज्या आहे? तूच संपवलेस सगळे पैसे—"

“पण तुझ्यासारखे फॅशनमधे, बांगड्या, कर्णफुलं नि रिबिनी-गोंड्यांत नाही उडवीत आम्ही. काय ते एकेक गोंडे नि लांबलांब कर्णफुलं! एकेक मेंढीच बांधीत जा आता वेणीला. आणि म्हशीच्या गळ्यातल्या घंटा— ”

“असू दे. तू नाही का घेत काही– ”

“आम्ही पुस्तकं घेतो म्हटलं. त्यानं ज्ञानात भर पडते. माणसानं नेहमी वाचीत राहावं असं म्हटलंच आहे– ”

“मृत्युंजय कथा ना? त्यानं ज्ञानात भर पडते! लोकांच्या घरच्या चोऱ्या कशा पकडाव्यात ह्याचं चांगलं ज्ञान मिळतं.”

“नले, जास्त पिटपिट केलीस तर मंडळातून काढून टाकीन हां– सांगून ठेवतो– ”

“टाक जा खुश्शाल!”

“अश्शं का, मग तेव्हा कशाला रडत होतीस आम्हाला घ्या म्हणून —चोरून कशाला ऐकत होतीस?”

“मला एकटीला कंटाळा येत होता म्हणून.”

“मग आज कोण भेटलंय? ती नकट्या नाकाची मोनिका का चुरमुऱ्याच्या पोत्यासारखी फुगलेली लता– वा, नाव आहे लता पण आहे मोठा वटवृक्ष!”

“अज्या, बघ हं माझ्या मैत्रिणींना चिडवलंस तर– ”

“चिडवीन जा! काय करशील ग रडूबाई? येऊन जाऊन ‘अज्या बघ हं—आई आली की सांगेन’ हेच ना? सांग जा खुश्शाल, पण अजून आई यायला आठ दिवस अवकाश आहे तोवर घोटून घोटून तयार करा वाक्यं आणि डोळ्यांतनं किती शेर पाणी काढायचं ते ठरवून ठेवा, पण आता टळा इथून.”

“अय्या, आठ दिवस नाही काही. परवाच तर येणार आहेत आई-

बाबा."

"परवा? तुला कुणी सांगितलं?"

"ह्यानं–" हातातल्या लाल कागदाची घडी त्याच्या डोळ्यापुढे फिरवीत नली म्हणाली, "विचार हवं तर संजीवला."

"त्याला काय माहिती?"

"त्यानेच तर वाचली तार."

"तार?"

"हो, ही बाबांची तार आलीय. ते परवा येताहेत. वाटेत दिल्लीला थांबणार होते तो बेत त्यांनी रद्द केला आहे. ओ हो! आता परवा मजाच मजा .."

आईबाबा येणार म्हणून नलीला इतका आनंद झाला होता की त्यापुढे अजय ज्या कामासाठी गेला होता त्याचं पुढं काय झालं, गौरीचा तपास लागला का नाही ते विचारायचे ती विसरूनच गेली.

"बघू बघू" अजयने नलीच्या हातातून तार ओढून घेऊन वाचली. आईबाबा येणार म्हणून प्रथम त्यालाही खूप आनंद झाला. पण दुसऱ्याच क्षणी त्याला आठवले की आईबाबा आले की आपल्याला असे बाहेर जायला मिळायचे नाही आत्तासारखे. म्हणजे गौरीचा शोध लावायला आता फक्त उद्याचाच दिवस हातात आहे. कसेही करून उद्या शोध लावायलाच हवा. बिचारी गौरी किती संकटात सापडली आहे. आपल्याला आपले आईबाबा परवा भेटतील. गौरीलाही तिचे आईबाबा भेटायला हवेत.

उद्या कसंही करून 'याझदान' हॉटेल शोधून काढायलाच हवे. पण गौरी अजून तिथेच असेल का?

अजय विचार करीतच झोपला.

□

# ९. गोरेगाव

दुसऱ्या दिवशी दुपारी अजय, गज्या, भास्कर आणि बुलुंद गोरेगाव स्टेशनवर उतरले. तिकिटे देऊन स्टेशनच्या बाहेर पडले.

" अज्या, आता ? कुठली दिशा ? "

" थांब, समोरच्या दुकानदाराला विचारूया. "

अजय, गज्या रस्ता ओलांडून समोरच्या खेळण्यांच्या दुकानात गेले. नाना तऱ्हेची रंगीबेरंगी खेळणी तिथे मांडलेली होती. ती रंगीत खेळणी पाहून अजयला गौरीची आठवण झाली. एक खेळणे तिच्यासाठी घ्यावे असे त्याला उगीचच वाटले आणि त्याने पटकन् एक छोटे खेळणे खरेदी केलेही. गज्याला ते पाहून आश्चर्य वाटले. त्याने विचारले,

" अरे, हे कशाला आत्ता ? आपण चाललो आहोत कुठल्या कामासाठी आणि— "

" तिलाच घेतलं आहे " खेळणे खिशात सारीत अजय म्हणाला.

" कुणाला, गौरीला ? "

" हो. "

" अरे पण तिचा पत्ता कुठं लागला आहे अजून ? यडचाप आहेस. आधी पत्ता विचार त्या दुकानदाराला. "

अजयने त्या दुकानदाराला विचारले. पण त्याला पत्ता माहीत नव्हता. ' याझदान ' हे नावही त्याने ऐकले नव्हते. दोघेही बाहेर पडले.

" एखाद्या इराण्याला माहीत असेल रे. त्यांचीच असतात असली नावं. " बुलुंदने आपलं ज्ञान दाखवले.

पुढच्या चौकापर्यंत सगळे चालत गेले तेव्हा त्यांना एक इराण्याचे हॉटेल दिसले. पण त्याचे नाव वेगळेच होते. बल्याने पुढे होऊन चौकशी

केली, पण त्यालाही माहीत नव्हते. खंबायत रोडही त्याने ऐकला नव्हता.

मग त्यांनी एका चांभाराला धरले. नाकात तपकीर कोंबीत तो म्हणाला, "हकडं तर कुटं नाव बी न्हाई ऐकल्यालं. म्या म्हइन्या दोन म्हइन्याला रस्तं बदलून बसतुया न्हवं. पल्याडल्या बाजूला पघा रेल-वेच्या."

त्याच्या सांगण्याप्रमाणे सगळी फौज रेलवेच्या दुसऱ्या भागात दाखल झाली. पण तिथेही खूप पायपीट आणि चौकशी करून काही पत्ता लागेना.


"अज्या, बहुधा खंबायत रोड ही अगदी आडगल्ली असावी आणि ते हॉटेलही अगदी सामान्य असावं." गज्याने निष्कर्ष काढला.

"आता पोस्टातच जाऊन चौकशी करूया म्हणजे ही तांगडतोड वाचेल."

"पण पोस्ट तरी कुठे आहे?"

"ते सांगेल रे कुणीही."

"जरा थांब, मोठमोठे दुकानदार, हॉटेलवाल्यांना विचारून झाले. पानपट्टीवालापण झाला. आता ह्या भाजलेल्या शेंगा विकणाऱ्या हातगाडी-वाल्याला विचारूया. हे लोक माल खपवण्यासाठी सगळीकडे हिंडतात



तेव्हा त्याला माहीत असेल कदाचित." अजय म्हणाला.

"तूच विचारून ये. आम्ही इथंच थांबतो. येताना शेंगापण आण."

अजय पुढे गेला. हातगाडीपाशी उभा राहिला.

"गरम आहेत का शेंगा?"

"व्हय. एकदम गरम." शेगडीवरच्या कढईतल्या शेंगा वरखाली करीत तो म्हणाला.

"दहा पैशाच्या चार पुड्या दे बांधून. भैय्या, इकडे याझदान हॉटेल कुठाय?"

"होटल? न्हाई बा."

"बरं, खंबायत रोड माहीत आहे?"

"हां, असे समोर जाऊन ती पिवळी बिल्डिंग दिसतिया तथनं उजव्या अंगाला वळा. तथं एक पीर लागल, त्येला डावलून डाव्या अंगानं म्होरं ग्येलात की फर्लांगावर डाव्या हाताला गल्ली हाय. त्योच खंबायत रोड. पन तियं काय होटल न्हाई तुम्ही म्हनता त्ये....हां, तियं येक प्रेस आनि गोदाम हाय माल ठिवायचं. त्येचं नाव हाय 'याझदान प्रिंटिंग प्रेस'. पर त्ये तर बंदच हाय. कुटं ग्येलाय मालाक कुना ठावं? माझ्याकडनं नेहमी शेंगा घ्यायचा!" पुडे बांधून हातात देत हातगाडीवाल्याने माहिती पुरवली. अजय कंपूकडे परतला.

"का रे, लागला का पत्ता?" त्याच्या हातातून शेंगांचा पुडा घेऊन सोडीत गज्याने विचारले.

"येस्. हा पठ्या गेल्यावर काम फत्ते झालंच पाहिजे."

"लेका, उगीच भाव खाऊ नकोस."

"खरंच सापडला. चला माझ्या मागोमाग."

"कुठे?"

"मी तुमचा म्होरक्या ना? मग प्रश्न विचारायचे नाहीत. चला

म्हटलं की चला."

"बरं बाब्रा, पण जरा तहानेनं सुकलेला घसा तर ओला करू देशील का नाही? त्या गुऱ्हाळात चल. एक एक ग्लास रस पिऊ. मग येऊ तू म्हणशील तिथे." बुलुंद कपाळावरचा घाम निपटीत म्हणाला. तो घामाने अगदी डबडबला होता. शर्ट भिजून पाठीला चिकटला होता.

सगळेच मग गुऱ्हाळात शिरले.

"चार ग्लास थंडगार रस." गज्याने ऑर्डर सोडली.

"लिंबू जास्त पीळ रे" भास्कर म्हणाला, "अज्या, खरंच मिळाला आहे ना पत्ता बरोबर? नाहीतर मागच्यासारखी उगीच पायपीट—"

"भास्कर—" अजय जरा रागानेच ओरडला. त्याबरोबर पुन्हा तो आपल्याला मंडळातून कटवतो की काय अशी भास्करला भीती पडली, म्हणून तो घाईघाईने म्हणाला,

"तसं नव्हे रे! पण उद्या तुझे आईबाबा येणार म्हणजे आजचाच दिवस आपण असे मोकळेपणानं हिंडू शकू. तेव्हा पत्ता बरोबर विचारून घे."

"काय सांगितलं रे त्या भैय्यानं?" बाहेर पडल्यावर गज्याने विचारलं.

"याझदान नावाचं हॉटेल काही त्याला माहीत नाही. पण खंबायत रोडवर एक याझदान प्रेस आहे म्हणे. आता आपण तिथं जायचं."

"पण तू तर हॉटेल म्हणाला होतास."

"अरे, तो माझा तर्क होता. तो माणूस काही हॉटेल असं म्हणाला नव्हता. कदाचित ते घराचं नावही असेल अगर प्रेसचं. दोन्ही वेळा नुसतंच याझदान ऐकलं मी.— बघू या तर जाऊन."

भैय्याने सांगितलेल्या खाणाखुणा पटवीत उजव्या डाव्या रस्त्याला वळत मंडळी खंबायत रोडपर्यंत तर आली.

या बाजूला वस्ती अगदी गलिच्छ होती. छोटी छोटी बैठी पत्र्याच्या शेडची घरे, केराचे उकिरडे आणि सांडपाण्याची उघडी गटारे. एक हाकेच्या अंतरावरून एक मोठा रस्ता जात होता.— कुठे कुणास ठाऊक !

याच वस्तीत एक जुनाट एकेरी विटेची बैठी इमारत होती. बांधकामाला बाहेरून प्लास्टरही केलेले नव्हते. विटांच्या मधले वाशाचे खांबही ओबडधोबडच होते. वर पत्र्याची शेड होती आणि खिडक्यांना लाकडी–साधी दारे होती. इमारतीच्या भोवताली रानटी झुडपांचे कंपौंड होते. थोडे पुढे जाताच मुख्य दरवाजाच्यावर रंग उडालेली एक पाटी लटकत होती.

'याझदान प्रिंटिंग प्रेस.'

कंपौंडपाशीच अज्या, गज्या, भास्कर, बुलुंद थांबले. शेंगावाल्याने पत्ता तर बरोबर दिलान्. पण इमारतीचे मुख्य दार बंदच होते.

"अज्या, इथं तर कुणीच दिसत नाही?"

"प्रेस तर बंदच आहे की रे."

"अज्या, आत जायचं का?"

"हो, पण सगळ्यांनी नाही. मागच्यासारखेच दोन गट पाडायला हवेत. बल्या, तू आणि भास्कर मागच्या कंपौंडपाशी दबा धरून बसा. मी आणि गज्या आत जाऊन येतो. काही वाटलं तर खुणेची शीळ घालीन."

"बरं" असे म्हणून बल्या अणि भास्कर पिछाडीला गेले. गज्या आणि अजय कंपौंडला असलेल्या फटीतून हळूच आत शिरले. आत शिरताना काटेरी झुडपांनी गज्याला चांगलाच ओरखडा काढला.

सबंध इमारतीच्या भोवती त्यांनी हलकेच फेरी मारली. पण सगळ्या खिडक्या बंद होत्या. खिडक्या लाकडी होत्या, फक्त एकच काचेची

होती. मागच्या बाजूची, पण त्या काचांनाही काळा रंग लावलेला होता. आत कुठेही मशीन चालू असल्याचा आवाज येत नव्हता. कुणा माण-सांची चाहूलही ऐकू येत नव्हती. अजयला वाटले– इथपर्यंत येऊनही आपली खेप फुकट जाणार. काचेच्या खिडकीपाशी उभे राहून तो विचार करत होता.

इतक्यात त्याला खोल कुठून तरी मुलाच्या रडण्याचा आवाज आला. प्रथम त्याला वाटले– आपल्याला भास होतोय.

" गज्या, तुला आवाज आला ? "

" कशाचा ? "

" तान्ह्या मुलाच्या रडण्याचा. "

" नाही बुवा ! "

" नाही कसा ? नीट ऐक. इकडे ये. ह्या काचेच्या खिडकीला कान लाव. "

" हो, येतोय खरा. पण खूप खोल कुठून तरी येतोय. "

" म्हणजे आत कुणीतरी आहे. "

" या काचेतनं काहीच दिसत नाही रे. "

" थांब; तुझ्याजवळ चाकू आहे ? आण तर इकडे. "

" कशाला ? "

" हा वरचा रंग खरवडून काढूया म्हणजे आतलं दिसेल. ब्लॅक आऊटच्या वेळी बाहेरनं लावलेला दिसतोय. " असे म्हणून अजयने गज्याच्या जवळचा छोटा चाकू घेऊन हळूच रंग खरवडायला सुरुवात केली. थांबून थांबून, कानोसा घेऊन त्याने आपले काम पुरे केले आणि एक चार इंचाची पट्टी खरवडून काढली.

त्याने त्या पट्टीला डोळे लावून आत पाहिले. प्रथम त्याला काहीच दिसले नाही. खिडक्या बंद असल्याने आत तसा अंधारच होता. वरच्या

छपराला मात्र दोन झरोके असावेत, कारण तिथून उजेड आत येत होता. गज्याने आणखी थोडा रंग खरवडून काढला आणि त्यानेही त्या पट्टीला डोळे लावले.

आत जिकडे तिकडे कागदाचे गठ्ठे पडलेले दिसत होते. अर्ध्या भागात छापण्याची मशिनरी असावी बहुतेक. पण बाकी काहीच दिसत नव्हते. डाव्या हाताला गोणपाटात बांधलेले पार्सलसारखे मोठेमोठे गठ्ठे होते.

पण ज्याच्या रडण्याचा आवाज आतून आला असे वाटले ते मूल कुठेच दिसत नव्हते; अगर कुणा माणसांची चाहूलही येत नव्हती.

अजय–गज्या दोघांनीही खिडकीतून आपले डोळे काढून घेतले आणि एकमेकांकडे पाहिले.

“ भासच झाला बहुतेक आपल्याला ” गज्या म्हणाला.

“ नाही रे, मी नक्की ऐकला···· बघ बघ, अजून येतो आहे. पिसाळून रडल्यासारखा. आणि आता जास्त जवळ पण येतो आहे. ”

बोलता बोलता गज्याने एकीकडे आणखी थोडा खिडकीवरचा रंग खरवडला होता. आता त्यालाही रडण्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू आला. दोघांनीही परत आपले डोळे खिडकीला लावले.



आणि त्यांना आत एक हृदयद्रावक दृश्य दिसले. आत एका माणसाने त्या गासड्यांच्यामागून एका छोट्या मुलीला फरपटत आणले आणि मशीनसमोरच्या जागेत दाण्णदिशी आदळले. दोन-एक वर्षाची ती मुलगी अगदी किंचाळून किंचाळून रडत होती आणि प्रत्येक वेळी तिने आवाज चढवला की तो माणूस तिच्या अंगावर चापट्यांचा वर्षाव करीत होता आणि तोंडाने शिव्या मोजीत होता.

" अज्या, तोच का रे ? " गज्या पुटपुटला.

" हो. "

" म्हणजे ती गौरीच ? "

" शंकाच नको. "

" काय साला मारतोय रे ! काही काळीज आहे की नाही ? "

" अरे, ही लोकं नेहमीच आपलं काळीज खुंटीवर ठेवून येतात. गज्या, असं वाटतंय की– "

" अज्या, काहीतरी करायला पाहिजे रे. तो हैवान तिचा जीवसुद्धा घेईल. "

" तोच विचार करतोय. "

" पुढचं दार वाजवून आत घुसू या का. "

" शहाणा आहेस ! मरायचं आहे ? "

" बुलुंदला बोलावू का अज्या ? तो मारामारीला भारी आहे. " गज्याने दोन्ही बोटे तोंडात घालून शिट्टी वाजवण्याची तयारी केली.

" थांब. इतक्यात नको. आधी आत तर जायला हवं. " त्या दांडग्या इसमाने आता मुलीला गासड्यांच्या ढिगावर नेले होते त्यामुळे ती दिसत नव्हती, पण तिच्या रडण्याचा आवाज येतच होता.

पण एकदम तो आवाज बंद झाला.

" तोंडात बोळा कोंबला काय रे तिच्या ? " गज्याने विचारले,

" गुदमरल्यासारखा आवाज येतोय बघ."

" असेल बाबा ! ही दुष्ट माणसं तिचा जीवसुद्धा घेतील... काय करू रे? आत जायला मिळालं पाहिजे फक्त, मग मी बघून घेतो पुढचं." अजय तळमळून म्हणाला. त्याला त्या पोरीचे हाल पाहवत नव्हते.

थोड्या वेळाने तो माणूस गासड्यांच्या ढिगामागून एकटाच पुढे आला. त्याच्या हातात उघडा चाकू होता. तो पाहून अजय–गज्यांचा छातीत चर्र झाले. या माणसाने गौरीचं काही बरंवाईट तर केलं नाही.

चाकू हातात घेऊन त्या माणसाने तिथल्याच एका गठ्याला बांधलेला दोर कापला आणि वरचे तरट बाजूला करून आत हात घालून काहीतरी काढून आपल्या खिशात घातले आणि याझदानचे पुढचे पत्र्याचे दार उघडून तो बाहेर पडला. दार बंद झाले.

पावलांचा आवाज दूरवर गेला. गज्याने कंपौंडच्या एका कोपऱ्याशी जाऊन पाहिले. लांब लांब ढांगा टाकीत तो माणूस कोपऱ्यावरून दिसेनासा झाला.

गज्याने खुणेची शीळ घालताच भास्कर, बुलंद दोघेही कंपौंडमध्ये घुसून मागच्या खिडकीशी आले. अजयने त्यांना सगळी हकीगत सांगितली.

" मग आता काय करायचं रे ? " भास्करने विचारले.

" आता आधी आत प्रवेश मिळवायला हवा. तो माणूस पुन्हा परत येण्याच्या आत गौरीची सुटका करायला हवी. "

" पण आत जाणार कसं ? सगळी खिडक्या दारं तर—— "

" सोपं आहे. "

" कसं ? "

" अज्या, वरच्या पत्र्यावर चढून त्या झरोक्यातून आत उडी मार की त्या गासड्यांच्या ढिगावर. " बुलंद काचेला डोळे लावून आत बघत

होता. वरच्या झरोक्यातून उजेड आत आलेला दिसला, तसे त्याचे डोके चालले.

" पण गुरू ! इतक्या उंच पत्र्यावर चढणार कसे ! "

" शिडीनं. "

" इथं शिडी कुठाय ? का आणणार आहेस तुझ्या भीमसेनवाडीतून. "

" बुद्धू आहेस ! लाकडाची शिडी नाही म्हणत मी. "

" मग कसली ? "

" माणसांची. "

" कोड्यात नको. इतका वेळ नाही. सरळ सांग. "

" अरे, आपण चौघं आहोत, एकाच्या खांद्यावर एक उभे राहूया ना पिरॅमिडसारखे. गोकुळ अष्टमीला दहीहंडी फोडायला नाही का उभे राहात— तसे. " बुलुंदने स्पष्टीकरण केले, " मी, गज्या खाली उभे राहतो. आमच्या खांद्यावर तू उभा राहा. "

" तरीसुद्धा उंची नाही पुरणार. आणि असं उभं राहिलेलं आपल्याला कुणी पाहिलं तर– "

" शिवाय वर धरायला काहीच आधार नाही. "

" आणि त्या झरोक्याला पिवळी काच बसवली आहे ते तुझ्या लक्षात आलं नाही का, बुलुंद ? उजेड बघ कसा पिवळा पडला आहे तो. "

भास्कर, गज्या, बुलुंद आपसात चर्चा करीत होते, पण अजय मात्र गप्प होता. मृत्युंजयच्या स्टाइलने आंगठ्याने कानशिले दाबीत विचार करीत होता.

" अज्या, तू का बोलत नाहीस ? "

" काय करायचं— सांग ना लवकर— "

" आत्ता तो माणूस परत आला तर– "

" सांगतो, मंडळी सांगतो. " अजय म्हणाला, " गौरीला सोडवायचं

म्हणजे आत जायला हवं हे नक्की. आणि आत जायला वाट एकच आहे."

"कोणती? पुढचं दार उघडून?"

"छे, तो मार्ग धोक्याचा आहे."

"मग?"

"ही खिडकी पाहिलीत?— हीच ती वाट. ह्यातून आत जायचं."

"पण ही तर बंद आहे की जाम!" खिडकी उघडण्याची खटपट करीत भास्कर म्हणाला.

"असेना— बुलुंद तुझ्या हातात जोर आहे ना?" गज्याने विचारलं. त्यावर लगेच अस्तन्या सरसावीत बुलुंद म्हणाला,

"शंका आहे काय? एक ठोसा ठेवून दाखवू?"

"दाखव. पण आमच्या अंगावर नव्हे. ह्या बंद खिडकीच्या तावदानावर. एका ठोशात काच फुटली पाहिजे."

"हा घे." बुलुंदने मूठ उगारली, पण त्याला आवरीत अज्या म्हणाला,

"अरे, हाताला काचा लागतील ना. त्यापेक्षा एक दगड मारा. भास्कर, तुझा नेम चांगला आहे. हाण एक दगड."

भास्करने खाली वाकून एक अणकुचीदार दगड शोधला आणि थोड्या अंतरावर उभे राहून त्या खरवडून रंग काढलेल्या काचेवर नेम धरून मारला. त्याबरोबर काचेला तडा गेला.

आवाज ऐकून कुणी आलं तर नाही ना याची चाहूल घेऊन एका मिनिटात त्या चौघांनी तडा गेलेली काच उखडून काढून फेकून दिली.

"पण, अज्या— येवढ्याशा भोकातून तू आत जाणार कसा?" बुलुंदने शंका काढली.

"बल्या, तुला डोकंच नाही. अरे, आता आत हात घालून खिड-

कीचा बोल्ट काढता येणार नाही का ? "
भोकातून आत हात घालून आतला बोल्ट

थोड्याशा खटपटीनंतर गज्याने खालचा-
खिडकी उघडली, उघड्या खिडकीतून अजयने
त्याच्यामागोमाग सगळ्यांनीच आत उड्या घेत

" अरे, तुम्ही सगळे काय आत आलात ?
आला किंवा त्याचा साथीदार कुणी आत असत
सापडू की. " अजयने हलक्या सुरात दटावले.

" खरंच रे. " गज्याला ते पटलं.

" हे बघा, आता मी सांगतो तसं करा. भास्कर,
दबा धरून बैस. गज्या, तू प्रेसच्या ह्या डाव्या ब
लपून लक्ष ठेव. तो मघाचा इसम येताना दिसला तर इ
बुलुंद, तू मघाप्रमाणेच मागच्या कंपौंडाशी दबा धरून बै
आत हिंडून तपास करतो. गौरी सापडली की खुणेची शीट
मग तुम्ही सगळे या. "

साहसाची येवढी संधी चालून आली असताना तिथून बाहेर
यचे सगळ्यांच्याच जिवावर आले होते. पण करता काय ! अजय म्ह
ना. तो सांगेल ते ऐकलं पाहिजेच. " बरं " म्हणून गज्या, भा
बुलुंद पुन्हा उड्या मारून खिडकीबाहेर पडले. अजयने खिडकी
लावून घेतली आणि तो त्या अंधाऱ्या जागेत हलक्या पावलांनी हि
लागला. जिकडे तिकडे नुसता गठ्ठयांचा ढीग पडला होता. पिवळ
रंगाच्या कागदांचा ढीग एकीकडे सारलेला दिसत होता.

" कसले गठ्ठे आहेत येवढे कोण जाणे पण आडोसा धरून शोधा-
यला बरे आहेत " असे मनाशी म्हणत अजय त्या गठ्ठयांमधून हिंडू
लागला. ज्या गासड्यांच्या मागे त्या इसमाने त्या मुलीला नेले होते

ता तिथे कुणीच नव्हते.

कुठे ?— अजयला आश्चर्य वाटले. त्याला
प्रवेश मिळाल्यावर पुढचं सोप्पं— गास-
. तिला उचलायची आणि तो इसम यायच्या
ायची की झालं !

त्ताच नव्हता. छापखाना तसा काही फार
कत दबकत पुन्हा एकदा हिंडून सगळा

ा.

ाशी झाली ? त्याने तिला बरोबर नेली नव्हती
जादू केली ?

करत एका गासडीवर टेकला. इतक्यात त्याला पुन्हा
्याचा आवाज आला.

ान टवकारले.

ाज अजय बसला होता त्या गासडीखालूनच येत होता. गासडी-
याने गौरीला चेंगरली तर नाही ? आणि आपण त्यावर बसलो.

अजय ताडकन् उठला. त्याने तो गठ्ठा जोर लावून बाजूला सरकवला
काय आश्चर्य !

त्याला तिथे एक लाकडी दार दिसले. अजयने ते धरून वर उच-
ले तेव्हा आत एक खोल तळघर असावे असे दिसले. आत तसा
काळोखच होता, पण आत उतरायला पायऱ्या होत्या.

रडण्याचा आवाज त्या तळघरातूनच येत होता.

अजय हळूच त्या तळघरात उतरला. वरच्या जागेच्या निम्मे होते
ते तळघर. आत एका कोपऱ्यात झीरो पॉवरचा दिवा पेटलेला होता. त्या

मंद उजेडात अजयने पाहिले, तर दोन्ही हातपाय बांधून तोंडात बोळा कोंबून त्या मुलीला एका कोपऱ्यात टाकलं होतं. ती अजूनही मुसमुसत होती. रडून रडून तिचे नाकडोळे लाल झाले होते. अजयने आधी दुरूनच तिला हाक मारली, "गौरी ऽ"

हाक ऐकताच त्या मुलीने आपली मान फिरवली. त्याबरोबर आपण शोधत असलेली श्रीमती दलिका रॉय यांची मुलगी गौरी रॉय ती हीच याची अजयला खात्री पटली. त्याला आनंद झाला. अखेर आपली शंका आणि शोध बरोबर होता तर !— पण आता आधी तिला इथून लवकर हलवायला हवी.

अजय झटकन् तिच्याजवळ गेला. त्याने तिच्या तोंडातला बोळा काढून टाकला, हातापायाच्या दोऱ्या सोडल्या आणि तो तिला उचलू लागला.

पण तोंडातला बोळा काढल्यावर त्या मुलीने—गौरीने आणखीच मोठा सूर काढला. ती काही अजयला ओळखत नव्हती, त्यामुळे तिला वाटले हा मुलगा पुन्हा आपल्याला मारणार !

अजयला क्षणभर काय करावे कळेना. इतक्यात त्याला आठवले की आपल्या खिशात खेळणं आहे. मघाशी दुकानात आपण ते खरेदी केले आहे. त्याने पटकन् खिशात हात घालुन एक शिट्टी वाजवणारी प्लास्टिकची बाहुली बाहेर काढली आणि तिच्यासमोर धरून ती जोरात वाजवली.

लालपिवळ्या रंगाची ती आवाज काढणारी बाहुली पाहताच गौरीचे रडणे एकदम थांबले. ती हात पुढे करून खेळणे मागू लागली.

अजयशी गौरीची एकदम गट्टी जमली. खिशातून रुमाल काढून त्याने तिचे नाक डोळे स्वच्छ पुसले, दुसऱ्या खिशातले चॉकोलेट काढून त्याचा तुकडा तिच्या तोंडात घातला. त्याबरोबर गौरी खुदकन् हसली

आता गौरीला घेऊन पटकन् इथून निघायला हवे म्हणून अजयने तिला उचलून कडेवर घेतले. इतक्यात त्याची नजर तळघराच्या दुसऱ्या कोपऱ्यात गेली. तिथे कसली तरी भट्टी दिसत होती. गौरीला खाली सोडून अजय कुतूहलाने तिकडे वळला. हे काय आणखी ? भट्टीशेजारीच कसलीतरी रसायने दिसत होती. वनस्पती तुपाचे डबेही तिथे होते. लाकडाचा रंगवलेला भुसा एका खोक्यात होता तो चहाच्या पानां-सारखा दिसत होता.

—म्हणजे ही मंडळी आणखी काहीतरी बनवीत असावीत. पण काय ? आणखी थोडी इकडेतिकडे उचकाउचक करीत असतानाच त्याला वरती दरवाजा करकरल्याचा आवाज आला. त्याबरोबर आपण इथे कशा-साठी आलो आहोत याची त्याला आठवण झाली आणि त्याने मागे वळून चॉकोलेट खाण्यात दंग झालेल्या गौरीला उचलून कडेवर घेतली आणि तो झपाट्याने पायऱ्या चढून वर आला. अजय गौरीला घेऊन गासड्यांच्या आडोशाने खिडकीकडे निघाला. खिडकी उघडून गौरीला गज्याच्या हातात द्यायचे आणि आपणही उडी मारून धूम ठोकायची असा त्याचा विचार होता.

पण जाता जाता गासडीच्या धक्याने गौरीच्या हातातले खेळणे खाली पडले आणि ते पाहून गौरी मोठ्याने ओरडली. अजयने पटकन् तिच्या तोंडावर हात दाबला तशी तिने हातपाय झाडायला सुरुवात केली. अजयला लहान मूल घ्यायची तशी सवय कुठे होती ? गौरी हात पाय झाडून अंग टाकायला लागली म्हणून तिला सावरायसाठी त्याने तोंडावरचा हात काढला तर तिने भोकांड पसरले.

एव्हाना तो माणूस दार उघडून आत आला होता आणि गौरीच्या आवाजाने त्याचे लक्ष वेधले होते. आपण ह्या पोरीला तळघरात हातपाय बांधून टाकले होते आणि ही वर कशी आली ? तो तिला शोधायला

लागला.

अजय खिडकीपासून चार फुटांवर असतानाच त्या माणसाने त्याला गाठले. एका मुलाच्या कडेवर गौरीला पाहून प्रथम त्याला आश्चर्य वाटले. पण क्षणार्धात त्याच्या लक्षात सगळा प्रकार आला आणि त्याने खसकन् आपला सुरा उघडून अजयच्या पाठीला लावीत म्हटले,

" तिथंच थांब, नाहीतर फुकट मरशील ! "

पाठीला टेकलेल्या सुऱ्याच्या स्पर्शाने अजयच्या सर्वांगातून भीतीची लाट थरथरत गेली. साहस चांगलेच अंगाशी येणार असे दिसत होते. तो उभा राहिला पण त्याने गौरीला मात्र सोडले नाही.

" कोण तू ? "

" मी .. मी तुमच्यातलाच— " अजयने पहिल्या साहसाच्या वेळी त्या मुलाला बनवले तसेच याला बनवायचा विचार करीत सांगितले. पण या माणसाने अजयपेक्षा कितीतरी पावसाळे जास्त पाहिले होते.

" साल्या ! बनवू नकोस. सरळ सरळ सांग— तू इथं कसा आलास ? "

यावर अजय गप्पच राहिला. त्या माणसाने सुऱ्याचे टोक पाठीला टेकवूनच सगळीकडे दृष्टी फिरवली तेव्हा त्याला खिडकीची फुटलेली



काच दिसली.

"अस्सं, खिडकी तूच फोडलीस तर!"

"एकटाच आहेस की साथीदार आहे—" त्यानं अजयला एका-मागून एक प्रश्न विचारायला सुरुवात केली, पण अजयने एकाचेही उत्तर दिले नाही.

"साल्या! तुझं थोबाड असं उचकटायचं नाही. थांब, बाबूरामला येऊ दे— तुझी सगळी हाडं सरळ करतो— ह्या सालीनं एक वैताग आणलाय. थांब, आज तुला भट्टीतच टाकतो—" मोठमोठ्याने बडबडत त्या केसाळ हाताच्या माणसाने अजयच्या पाठीला सुरा टेकवूनच त्याला पुन्हा गौरीसकट तळघराकडे नेले.

□

## १०. पोलिस ... पोलिस

खिडकीखाली दबा धरून बसलेल्या भास्करने हे सगळे बोलणे ऐकले आणि त्याला दरदरून घाम सुटला. आपला म्होरक्या अजय संकटात सापडला आहे हे पाहून त्याचे सारे अवसानच गळाले. वास्तविक धोका दिसताच त्याने खुणेची शीळ घातली असती तर गज्या, बुलुंद धावत आले असते. तिघांनी खिडकीवाटे आत प्रवेश करून अजयची सुटका करणे काही कठीण नव्हते. कारण आतला माणूस एकटाच होता. हे चौघे होते.

पण घाबरलेल्या भास्करला हे सुचलेच नाही. तो आपला पाय उच-लून जो पळत सुटला तो एकदम रस्त्यावर आला. कुठेतरी पोलिसाला

गाठून त्याची मदत घ्यायला हवी. आता हे प्रकरण आपल्या ताब्यातले राहिलेले नाही. अजयच्या जिवाला धोका आहे एवढेच त्याला जाणवत होते.

पण पोलिसचौकी कुठे आहे ?— तो सगळाच भाग तसा अनोळखी. घाबरलेल्या अवस्थेत आपण कुठल्या रस्त्याने आलो तेही त्याला आठ-वेना. कुठेतरी मोठा रस्ता लागेल आणि निदान रस्त्यावरचा पोलिस तरी दिसेल या विचाराने भास्कर आपला धावत होता. मागून येणाऱ्या वाह-नाचेही त्याला भान नव्हते.

पण त्या टॅक्सीवाल्याला काही अपघात करून तुरुंगात जायचे नव्हते. त्याने कचकन् ब्रेक दाबले आणि शिव्यांचा वर्षाव करायला सुरुवात केली. टॅक्सीत एक उंच रुबाबदार माणूस बसला होता. तोही संतापला. कारण चूक भास्करची होती. तोच रस्त्यातून वेडा-वाकडा पळत होता. खाली उतरून त्या व्यक्तीने भास्करचे मानगूट धरले

"का रे, मरायचंय का ?"

"आता तुम्हीच बघा साहेब— पोलिसात आहात. अशी माणसं रस्त्याने बेदरकार चालतात आणि आमच्यासारख्यांच्यावर तुम्ही खटले भरता."

"खरं आहे तुझं म्हणणं. आपल्या लोकांना किती शिकवलं तरी साधे रस्त्यानं चालतासुद्धा येत नाही. चल ह्याला घेऊन पोलिसचौकीवर— आज चांगला धडा शिकवूया."

भास्करला हवे होते तेच मिळाले. तो म्हणाला,

"चला चौकीवर. मला तिथंच जायचं आहे."

"पोलिसचं नाव काढल्यावर तोंड उघडलं. पण बराच बेरक्या दिसतोय. कशाला जायचंय रे तुला तिथं ? कुणी आहे वाटतं गाववाला ? पण तो



१६७८८

नाही उपयोगी पडणार तुला सोडवायला आता बच्चंजी."

"तिथं कुणी नाही माझं. पण माझा मित्र संकटात सापडला आहे त्याला सोडवायचं आहे."

"अस्सं?" आता त्या रुबाबदार मिशीवाल्या माणसाला गंमत वाटायला लागली. त्याने हसत विचारले,

"कसल्या संकटात सापडलाय तुझा दोस्त?"

"हसू नका. खरंच सांगतो, मी पोलिस चौकीच्याच शोधात आहे. एक एक मिनिट महत्त्वाचं आहे. लवकर चला. तुमचे उपकार विसरणार नाही."— भास्कर आत टॅक्सीत जाऊन बसलासुद्धा.

हा खरंच मनापासून बोलतोय हे त्या गृहस्थाला पटलं. भास्करजवळ बसत दार लावून घेत त्याने विचारले,

"हं, सांग बरं सगळं. पाहू काही मदत करता आली तर. मी पोलिस इन्स्पेक्टरच आहे. हा बघ माझा बिल्ला. सध्या रजेवर आहे. तू चांगल्या घरचा मुलगा दिसतोस. न घाबरता सगळं सांग."

आणि भास्करने त्यांना सगळी हकीगत सांगितली. ती ऐकता ऐकता इन्स्पेक्टर दिवाडकर गंभीर झाले.

—पुढची सगळी चक्रे मग जोरात फिरली. पोलिसांच्या पार्टीने 'याझदान'ला वेढा घातला आणि गौरीला ताब्यात घेतले. एका दगडात दोन पक्षी मारावेत तसा गौरीबरोबरच त्यांना तिथे चोरटा माल आणि भेसळीचा कारखाना सापडला. वनस्पती तुपामधे चरबीची भेसळ करण्यासाठी लागणारी रसायने आणि भट्टी मिळाली. अजयने तळघरात पाहिलेली भट्टी ती हीच होती. आणि लाकडाचा भुसा होता तो चहाच्या भुकटीत मिसळण्यासाठी रंगवून ठेवला होता.

केसाळ हाताच्या त्या इसमाला आणि त्याच वेळी तिथे आलेल्या बाबूरामलाही पोलिसांनी पकडून ताब्यात घेतले. जवळ जवळ अडीच

लाखांचा माल मिळाला. या टोळीच्या शोधात पोलिस बरेच दिवस होते. या दोघांना पकडल्यामुळे त्यांचा म्होरक्या जो डी. वाय. एस्. या नावाने ओळखला जात होता त्यालाही पकडणे पोलिसांना सोपे गेले.

इन्स्पेक्टर दिवाडकरांची शाबासकीची थाप पाठीवर घेऊन अजय आपल्या दोस्तांसह घरी परतला. अखेर आपण एक साहस अंगावर घेऊन त्यात यश मिळवले म्हणून त्याला अभिमानही वाटत होता आणि आनंदही झाला होता तो गौरीची आणि तिच्या आईची भेट झाली म्हणून. त्या मायलेकरांच्या भेटीचा सोहळा आठवून त्याला अगदी समाधान वाटत होते. अर्थात हे काही त्याचे एकट्याचे श्रेय नव्हते. सगळ्या दोस्तांनी त्याला साहाय्य केले होते. सगळ्या दोस्तांना एक जंगी पार्टी द्यायचे त्याने ठरवून टाकले.

नाक्यावर येताच सगळ्यांनी एकमेकांचा आनंदाने निरोप घेतला. आपला अजय मोठ्या संकटातून सुटला म्हणून सर्वांनाच आनंद झाला होता.

□

## ११. अजब-गजब झिंदाबाद

दुसरे दिवशी सकाळी अजयचे आईबाबा काश्मीरच्या ट्रिपहून परत आले. नली-अजयला आई आल्याचा खूप आनंद झाला. आईबाबा आल्यावर घर एकदम भरून गेले.

" अजय, किती भांडलास नलीशी ? "

" तिलाच विचार ना. "

" नाही आई, आम्ही मुळीच भांडलो नाही— " नलीने कबुली देताच आईला खूप बरे वाटले. दोन्ही मुलांना जवळ घेऊन कुरवाळीत ती म्हणाली,

" आहेतच माझी बछडी तशी गुणाची! अजयराजा, असंच प्रेम करीत जा बहिणीवर. "

" ए आई, पेटी उघड ना— " नलीला घाई झाली होती. आईने काश्मीरहून आपल्यासाठी काय आणले आहे ते पाहण्याची.

" बरं बरं, चला आत— " आईने आत जाऊन पेटी उघडली. बाबांनी फोटोंचा गठ्ठा काढला. पेटीतून एक एक चीज बाहेर येत होती आणि मुलांचे चेहरे आनंदाने फुलत होते.


इतक्यात बाहेर बेल वाजली. हरीने दार उघडले आणि तो सांगत आला,

" साहेब, बाहेर पोलिस इन्स्पेक्टर आले आहेत. "

" इन्स्पेक्टर ? ते कशाला ? "

" अजयबाबूची चौकशी करतायत. "

" अजयची ? " बाबांचा चेहरा गंभीर झाला. हातातले फोटो ठेवून ते बाहेर गेले. पोराने काय झेंगट केलं आहे ? कुणाची काचबीच फोडली



का क्रिकेट खेळताना कुणाला दुखापत केली ? का नको म्हटलं होतं तरी मी इथे नाही असं पाहून ड्रायव्हिंग शिकला आणि ॲक्सिडेंट वगैरे केलान्— गाढवाचं वय तरी आहे का अजून ?—छे छे, ही पोरं म्हणजे—

पण गंभीर चेहऱ्याने बाहेर गेलेले बाबा थोड्या वेळाने आत आले तेव्हा त्यांचा चेहरा आनंदाने, अभिमानाने, कौतुकाने फुलला होता. आल्याबरोबर त्यांनी अजयला पोटाशी धरलं आणि त्याच्या हातावर नवेकोरे घड्याळ बांधले.

इन्स्पेक्टर दिवाडकरांनीही अजयला बक्षीस आणले होते. पण अजय ते घेईना. तो म्हणाला,

"बाबा, मी एकट्याने नाही— आम्ही सगळ्यांनी मिळून साहस केलं आहे."

"हो तर, सगळ्यांनाच आणलं आहे ना बक्षीस— हा क्रिकेटचा सेट ! सगळ्यांना मिळूनच आहे, आणि आज दुपारी गौरीचे आईवडील येणार आहेत तुमच्यासाठी मोठ्ठं प्रेझेंट घेऊन. त्यांना तर केवढा आनंद झाला आहे." इन्स्पेक्टर दिवाडकर म्हणाले, "हे बघ, तुझ्या सगळ्या गँगला बोलावून घे."

"जेवायलाच बोलाव रे" आईने सांगितले. तिला तर आपल्या मुलाला कुठे ठेवू न् कुठे नको असे झाले होते. मुलगा संकटातून सुटल्याचा आनंदही होताच.

आईने सांगितले आणि अजय धावत निघाला.

"अज्या, मला विसरू नकोस हं–" नलीने तेवढ्यात बजावलेच.

"नाही बरं, लिंबूटिंबू–"

"काय म्हणालास ?— सांगू का आईला ?"

नलीने भांडणाचा पवित्रा घेतला. पण आज अजयला भांडायला वेळ

नव्हता. तो सटकलाच.

अजय, भास्कर, गज्या, बुलुंद— या चौकडीने मग दुपारी काय धुडगूस घातला असेल याची कल्पना करा. सगळ्या हॉलमध्ये घोषणा दुमदुमत होती,

"अजब-गजब झिंदाबाद...अजब-गजब झिंदाबाद!" त्यांच्या सुरात सूर मिसळून जिगरही भुंकत होता.

□ □

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. १६१७७ नों. दि.
वि. ८१.८१

कालाच्या प्रवाहाबरोबर धावणारा 'माणूस'च विसाव्या शतकात यशस्वी जीवन जगतो. आजच्या युगाची गरज लक्षात घेऊन साध्या, सोप्या भाषेत अधिकारी लेखकांनी लिहिलेली विकास पुस्तके आपल्या यशाचा मार्ग उज्ज्वल करतील !

**मित्र कसे मिळवावे ?**
**कुठे कसे वागावे ?**
—श्रीपाद जोशी

**सभेत कसे बोलावे ?**
**संभाषणकला**
—भीमराव कुलकर्णी

**व्यवहारचतुर कसे व्हावे ?**
—रघुवीर सामंत

**स्वयंसूचना**
**हसत खेळत मनाची ओळख**
—द. पां. खांबेटे

**तरुण दिसा, खूप जगा**
—न. ल. वष्ट

**दीर्घायुषी व्हायचे आहे ?**
—डॉ. सुमती क्षेत्रमाडे

**गृहसजावट**
—सौ. प्रभा पानसे

**सौंदर्यसाधना**
—सौ. चारुशीला गुप्ते

**ज्ञान आणि मनोरंजन**
—भा. रा. भागवत

**ज्ञान आणि मनोरंजन**
—राम कृ. जोशी

मूल्य प्रत्येकी साडेन. रुपये, तीनरंगी मुखपृष्ठ, आत अनेक चित्रे
टिकाऊ कागद, सुबक छपाई, मजबूत बांधणी.

# मॅजेस्टिक किशोर साहस

## संपादक : भा. रा. भागवत

### शाळेतली भुताटकी : शैलजा राजे

काय म्हणता ? शाळेत भुताटकी होती ? विश्वास तरी बसेल कुणाचा असल्या थोतांडावर ? पण पोरींची घबराट उडाली खरी ! शेवटी आमच्या चिमुरड्या मिंकीने भुताचे उलटे पाय पकडण्याचा बेत केला आणि निघाली ती त्याच्या मागावर...—हं ! ही टिंबं नाहीत बरं. ही भुताची पावलं आहेत !

### डाकूंची टोळी आणि बालवीर : लीलावती भागवत

कुठे गेला तो क्रिकेटप्रेमी रमेश ? घरची मंडळी तर हबकूनच गेली. आमच्या बालवीरांना यात काहीतरी काळेबेरे आहे असा वास आला आणि मग आपल्या 'स्काऊट' ज्ञानाचा उपयोग करून रमेशला हुडकून काढण्यासाठी त्यांनी आख्खी मुंबई पालथी घातली !

### सम्राट चंद्रगुप्त : ग. वि. साळवी

ही एक आगळी साहसकथा आहे. कुणाची ते नावावरून कळेलच. इतिहासातल्या धाडसी कुमारांचा मुकुटमणी म्हणजे चंद्रगुप्त. त्याच्या लहानपणच्या खेळातच त्याचे राजतेज प्रकट झाले होते. पराक्रमी चंद्रगुप्ताची कथा इथे अगदी वेगळ्या नि चटकदार पद्धतीने सांगित

IRBK-0116179

IRBK-0116179

### दीपमाळेचे रहस्य : भा. रा. भागवत

देवळापासून अलग झालेली आणि समुद्रात ...
एक दीपमाळ ! कुणी म्हणे, ती दीपगृहाप्रमाणे 'लाईट' फेकीत असते. कुणी म्हणे, तिच्या शिखरावर आकृत्या दिसतात. भुतं ! तर कुणी म्हणे, ती नक्की आतून पोकळ असली पाहिजे. ठोकून पाहू या ?...टक् टक् ! पण कोण करणार ती कटकट ! अनिल-महेशसारखी बहाद्दर पोरंच अशी मुलुखावेगळी मोहीम हाती घेऊ शकतात. एक मोठी चित्तथरारक रहस्यकथा.